# शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक-२.

रजि. ऑफीस आदिवासी विकास भवन, २ रा मजला, राम गणेश गडकरी चौक, जुना आग्रा रोड, नाशिक - ४२२ ००२.
दुरध्वनी - ०२५३-२३१५८६०, फॅक्स - (०२५३) २३१५८६०
Mail :- shabarinsk@gmail.com

## -: संचालक मंडळ सभा इतिवृत्त :-

दि.०३/०५/२०२३ रोजी मा.मंत्री, आदिवासी विकास तथा अध्यक्ष, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., यांचे अध्यक्षतेखाली दुपारी ३.०० वाजता मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झालेल्या संचालक मंडळ सभेस खालील संचालक / अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | नांव | हुद्दा | उपस्थित / अनुपस्थित |
|---|---|---|---|
| १ | मा.नामदार डॉ. विजयकुमार गावित<br>अध्यक्ष, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक तथा मा.मंत्री, आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई-३२ | अध्यक्ष | उपस्थित |
| २ | मा.श्रीमती नयना गुंडे<br>आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक | संचालक | उपस्थित |
| ३ | मा.श्री.रविंद्र जाधव<br>उपसचिव, आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई-३२ | संचालक | उपस्थित |
| ४ | मा.श्रीमती लीना बनसोड<br>व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक | सदस्य सचिव | उपस्थित |

मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन मा.अध्यक्ष यांच्या मान्यतेने संचालक मंडळाचे सभेस सुरुवात केली आहे.

**विषय क्र.१ :- दिनांक २३/०१/२०२३ रोजी संपन्न झालेल्या संचालक मंडळ सभेचे इतिवृत्त कायम करणे.**

दि.२३/०१/२०२३ रोजी मा.अध्यक्ष, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ तथा मंत्री, आदिवासी विकास यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या संचालक मंडळ सभेचे इतिवृत्त तसेच सदर सभेमध्ये पारित झालेल्या ठरावावर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल सभेस व्यवस्थापकीय संचालक यांनी सादर केला आहे.

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

**ठराव क्र.१ :- दि.२३/०१/२०२३ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेचे इतिवृत्त कायम करण्यात येत आहे. व ठरावावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सर्वानुमते मान्य करण्यात येत आहे.**

**सुचक** :- मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक
**अनुमोदक** :- मा.रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

**विषय क्र.२- दिनांक ०१/०९/२०२२ ते ३१/०३/२०२३ या कालावधीत महामंडळाने केलेल्या गुंतवणुक / फेर गुंतवणुकीचा अहवाल सादर करणेबाबत.**

दिनांक २८/०६/२००६ रोजी संपन्न झालेल्या संचालक मंडळाच्या सभेतील ठराव क्र.५ नुसार महामंडळाकडुन करण्यात येणा-या गुंतवणुकीचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांना प्रदान करण्यात आलेले आहेत.

दिनांक ०१/०२/२०२१ ते दिनांक ३१/०८/२०२२ अखेरपर्यंतच्या गुंतवणुकीच्या कार्यवाहीस दिनांक ३०/०९/२०२२ रोजी संपन्न झालेल्या संचालक मंडळाच्या सभेकडुन ठराव क्र.२ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

मु. का. नाशिक चे पत्र क्र. शआविविम/लेखा/२८०/२०१७ दिनांक ०८/०७/२०१७ अन्वये महामंडळाला डोअर स्टेप देणाऱ्या बॅकाकडुन पत्र मागविण्यात आले होते. त्यानुसार ज्या राष्ट्रीयकृत बँकांकडुन महामंडळाच्या गुंतवणुकीच्या अटी व शर्ती मान्य असणारे पत्र प्राप्त झाल्यास सदरच्या बँकांमध्ये गुंतवणुक करण्यात आलेली आहे. या पुढे सुध्दा महामंडळाच्या अटी व शर्ती ज्या राष्ट्रीयकृत बॅकाना मंजुर असतील त्याचे कडुन लेखी पत्र घेवुन गुंतवणुक करण्यासाठी महामंडळाच्या पॅनलमध्ये समावेश करण्यांचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांना देण्याचे मान्यतेस सादर.

दिनांक ०१/०९/२०२२ ते दिनांक ३१/०३/२०२३ या कालावधीतील शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक कार्यालयाने राष्ट्रियकृत बँकेत केलेल्या मुदत ठेव गुंतवणुक / फेरगुंतवणुकीचा सविस्तर तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | राष्ट्रीयकृत बँकेचे नाव | गुंतवणुक दिनांक | मुदत | व्याजदर | रक्कम रुपये लक्ष |
|---|---|---|---|---|---|
| **अ)** | **बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा कॅनडा कॉर्नर, नाशिक खाते क्र. २००४६६१५९५६ येथुन करण्यात आलेल्या मुदतठेव गुंतवणुका** | | | | |
| १ | बँक ऑफ बडोदा, शाखा मुंबई नाका, नाशिक | ११/११/२०२२ | १ वर्ष | ७.४०% | ५,३२,३२,१२७/- |
| २ | बँक ऑफ बडोदा, शाखा मुंबई नाका, नाशिक | २३/०१/२०२३ | १ वर्ष | ७.६१% | ४,२०,४७,९८५/- |
| ३ | पंजाब नॅशनल बँक, शाखा कॅनडा कॉर्नर, नाशिक | २५/०१/२०२३ | ३० दिवस | ५.५०% | २,२०,७१,०००/- |
| ४ | पंजाब नॅशनल बँक, शाखा कॅनडा कॉर्नर, नाशिक | २५/०१/२०२३ | ३० दिवस | ५.५०% | २,१०,००,०००/- |
| ५ | पंजाब नॅशनल बँक, शाखा कॅनडा कॉर्नर, नाशिक | २५/०१/२०२३ | ३० दिवस | ५.५०% | २,१०,००,०००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | इंडियन बँक, अंबड, नाशिक | २४/०२/२०२३ | ३० दिवस | ६.००% | २,५७,८६,६३७/- |
| ७ | महाराष्ट्र ग्रामीण बँक, नाशिक सिटी, नाशिक | २७/०२/२०२३ | १ वर्ष | ७.८०% | ४,००,००,०००/- |
| ८ | महाराष्ट्र ग्रामीण बँक, नाशिक सिटी, नाशिक | १३/०३/२०२३ | १ वर्ष | ७.८०% | ३,१७,१३,८५२/- |
| ९ | महाराष्ट्र ग्रामीण बँक, नाशिक सिटी, नाशिक | २७/०३/२०२३ | ३० दिवस | ६.५०% | २,५९,१३,८०४/- |
| **ब)** | **बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा कॅनडा कॉर्नर, नाशिक खाते क्र. ६०३४४९०९११८ येथुन करण्यात आलेल्या मुदतठेव गुंतवणुका** | | | | |
| १ | बँक ऑफ बडोदा, शाखा मुंबई नाका, नाशिक | २८/०९/२०२२ | १ वर्ष | ७.००% | २,२९,००,०००/- |
| २ | इंडियन बँक, अंबड, नाशिक | १२/१०/२०२२ | ९१ दिवस | ५.८०% | ८,४१,४७,९००/- |
| ३ | बँक ऑफ बडोदा, शाखा मुंबई नाका, नाशिक | १३/१०/२०२२ | १ वर्ष | ७.०५% | ५,४८,१३,९०७/- |
| ४ | युनियन बँक ऑफ इंडिया, शाखा नाशिक सिटी, नाशिक | १४/१०/२०२२ | १ वर्ष | ७.०५% | १०,०१,००,०००/- |
| ५ | बँक ऑफ बडोदा, शाखा मुंबई नाका, नाशिक | ०१/११/२०२२ | १ वर्ष | ७.०५% | २,१०,२९,१८३/- |
| **अ. क्र.** | **राष्ट्रीयकृत बँकेचे नाव** | **गुंतवणुक दिनांक** | **मुदत** | **व्याजदर** | **रक्कम रुपये लक्ष** |
| ६ | पंजाब नॅशनल बँक, शाखा कॅनडा कॉर्नर, नाशिक | ०२/११/२०२२ | १८१ दिवस | ६.९०% | ११,८७,०१,६१८/- |
| ७ | पंजाब नॅशनल बँक, शाखा कॅनडा कॉर्नर, नाशिक | १२/१२/२०२२ | ९१ दिवस | ५.२५% | २,१०,२९,१८३/- |
| ८ | पंजाब नॅशनल बँक, शाखा कॅनडा कॉर्नर, नाशिक | १२/०१/२०२३ | ४५ दिवस | ५.५०% | ३,००,००,०००/- |
| ९ | इंडियन बँक, अंबड, नाशिक | १२/०१/२०२३ | ९१ दिवस | ७.०५% | ५,५३,६४,७०२/- |
| १० | पंजाब अँण्ड सिंध बँक, शाखा नाशिक पुणे रोड, नाशिक | ०३/०२/२०२३ | १८१ दिवस | ७.४१% | १०,३०,००,०००/- |
| ११ | पंजाब अँण्ड सिंध बँक, शाखा नाशिक पुणे रोड, नाशिक | ०३/०२/२०२३ | १८१ दिवस | ७.४१% | १०,३०,९८,६७०/- |
| १२ | महाराष्ट्र ग्रामीण बँक, नाशिक सिटी, नाशिक | २७/०२/२०२३ | ९१ दिवस | ७.३१% | ३,०२,०३,४२५/- |
| १३ | महाराष्ट्र ग्रामीण बँक, नाशिक सिटी, नाशिक | १३/०३/२०२३ | ९१ दिवस | ७.००% | २,१३,०८,२१६/- |

वरील प्रमाणे गुंतवणुक माहितीस्तव तथा मान्यतेस्वत सविनय सादर.

**ठराव क्र.२ :- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या दिनांक ०१/०९/२०२२ ते दिनांक ३१/०३/२०२३ या कालावधीत केलेल्या मुदत ठेव गुंतवणुक / फेर गुंतवणुकीच्या कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे.**

**सुचक** :- मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक
**अनुमोदक** :- मा. रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

**विषय क्र.३- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., मुख्य कार्यालय, नाशिक यांच्या SCA व PVTG या योजनांचा निधी आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांच्या SNA खात्यात वर्ग करण्यांत आलेला आहे. करीता केलेल्या कार्यवाहीस मंजुरी मिळावी.**

शासन निर्णय क्र.बीयुडी-२०२१/प्र.क्र.८३/का.६ दिनांक १४/१०/२०२१ आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई नुसार आदिवासी विकास विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या केंद्र पुरस्कृत योजनांसाठी राज्य समन्वय यंत्रणा (Single Nodal Agency) व अंमलबजावणी यंत्रणा (Implementing Agency- IAs) घोषित करण्यात आलेली आहे.

त्यानुसार शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळास केंद्रिय सहाय्य योजनांबाबतीत Singal Nodal Agency म्हणुन **आयुक्त आदिवासी विकास, नाशिक** व Implementing Agency - IAs म्हणुन **व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक** यांना घोषित करण्यात आलेले आहे.

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाने SCA व PVTG या योजनांचा निधी खालील तपशिलाप्रमाणे आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांच्या SNA खात्यात वर्ग करण्यात आलेली आहे.

| अ. क्र. | ज्या बँक खात्यातुन रक्कम वर्ग केलेली आहे त्याचा तपशील | ज्या बँक खात्यात रक्कम वर्ग केलेली आहे त्याचा तपशील | रक्कम रु. |
|---|---|---|---|
| 1) | Account Name : Special Central Assistance To Tribal, SAVVM, HO, Nashik<br>Branch : Mumbai Vashi<br>Account No. 015101051573<br>IFSC Code : ICIC0000151 | Account Name : TRIBAL COMMISSIONER SPECIAL CENTRAL ASSISTANCE TO TRIBAL SNA<br>Branch : Vashi Branch, New Bombay<br>Account No. 015101051570<br>IFSC Code : ICIC 0000151 | **76,27,66,120/-** |
| 2) | Development Of Particularly Vulnerable Tribal Group,SAVVM, HO, Nashik Branch : Mumbai Vashi<br>Account No. 015101051578<br>IFSC Code : ICIC0000151 | Account Name : TRIBAL COMMISSIONER DEVELOPMENT OF PARTICULARLY VULNERABLE TRIVAL GROUP SNA<br>Branch : Vashi Branch, New Bombay<br>Account No. 015101051593<br>IFSC Code : ICIC0000151 | **1,09,48,680/-** |
| | **एकूण रक्कम रु.** | | **77,37,14,800/-** |

करीता शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाने PFMS प्रणालीशी मॅपींग करण्याच्या दृष्टिने आय.सीआय.सी.आय. बँकेत उघडण्यात आलेल्या खात्यांमधील निधी रक्कम रु.७७,३७,१४,८००/- (अक्षरी सत्यात्तर कोटी सदोतीस लाख चौदा हजार आठशे रुपये मात्र) दिनांक २२/०२/२०२३ रोजी आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांचे बँक खात्यात वर्ग करण्यात आलेला आहे. करीता सदरच्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबत मान्यतेस सादर.

**ठराव क्र.३ :- शासन निर्णय क्र.बीयुडी-२०२१/प्र.क्र.८३/का.६ दिनांक १४/१०/२०२१ आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई नुसार "राज्य समन्वय यंत्रणा (Single Nodal Agency-SNA) यांनी त्यांचे स्तरावर योजनानिहाय घोषित 'अंमलबजावणी यंत्रणा (Implementing Agency)' ची पदनाम निहाय PFMS प्रणालीशी मॅपींग करण्याच्या दृष्टिने शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाने आय.सीआय.सी.आय. बँकेत उघडण्यात आलेल्या खात्यांमधील शिल्लक निधी आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांचे पत्र क्र.SNA-बँक खाते/प्र.क्र.३०/का.८(२)/४८७ दिनांक १९/०१/२०२३ नुसार आयुक्तालय स्तरावर आय.सीआय.सी.आय. बँकेत असलेल्या SNA खात्यात दिनांक २२/०२/२०२३ रोजी वर्ग केल्याच्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे.**

**सुचक** :- मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक
**अनुमोदक** :- मा. रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

**विषय क्र.४- संवैधानिक लेखापरीक्षकाचे सन २०२०-२१ साठी लेखापरिक्षण शुल्क निश्चित करणेबाबत.**

काम्प्ट्रोलर अँड ऑडीटर जनरल नवी दिल्ली यांचे कडील पत्र क्र.CA.V/COY /MAHARASHTRA /SHABARI (१)/१२७९ दिनांक ०१.०९.२०२० अन्वये एल.के.सराफ, सनदी लेखापाल, नाशिक (WR2043) यांची शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या आर्थिक वर्ष २०२०-२१ या वर्षाच्या लेख्यांचे लेखापरिक्षणाकरीता संवैधानिक लेखा परिक्षक (Statutory Auditor) म्हणून नियुक्ती करण्यांत आलेली आहे.

यापुर्वीचे संवैधानिक लेखा परिक्षक साबद्रा अँड साबद्रा, सनदी लेखापाल, नाशिक (WR0234) यांना कांम्प्ट्रोलर अँड ऑडीटर जनरल नवी दिल्ली यांचे कडील पत्रातील लेखापरीक्षण शुल्क नुसार सन २०१९-२० चे लेखापरीक्षण शुल्क मंजुर करण्यांत येऊन अदा करण्यात आलेले आहे.

काम्प्ट्रोलर अँड ऑडीटर जनरल नवी दिल्ली यांचे कडील पत्र क्र.CA.V/COY /MAHARASHTRA /SHABARI (१)/१२७९ दिनांक ०१.०९.२०२० मधील ANNEXURE - II नुसार सन २०२०-२१ साठी लेखापरिक्षण शुल्क रक्कम रु.१,६२,८४०/- नमुद करण्यात आलेले आहेत. सदर रक्कम विचारात घेवून लेखापरीक्षण शुल्क खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यांत येत आहे.

**रक्कम (रु.)**

| **अ.क्र.** | **तपशिल** | **सन २०२०-२१** |
|---|---|---|
| १ | लेखापरीक्षण | १,६२,८४०/- |
| २ | अधिक - १५% टॅक्स ऑडीटची रक्कम रु. | २४,४२६/- |
| ३ | **एकूण (१+२)** | **१,८७,२६६/-** |
| ४ | अधिक - ९% सी.जी.एस.टी. रक्कम रु. | १६,८५४/- |
| ५ | अधिक - ९% एस.जी.एस.टी. रक्कम रु. | १६,८५४/- |
| | **एकूण रु. (३+४+५)** | **२,२०,९७४/-** |

जी.एस.टी. रक्कम सध्याच्या प्रचलित दरानुसार नमुद केलेली आहे. सदरच्या दरामध्ये वेळोवेळी होणा-या बदलानुसार, त्या वेळीच्या प्रचलित दरानुसार जी.एस.टी. ची रक्कम संवैधानिक लेखापरिक्षक यांना अदा करावी लागेल. तसेच सदरच्या रकमेतुन नियमानुसार आयकर कपात करण्यात येईल.

तसेच वरील प्रमाणे नमुद लेखा परिक्षण शुल्क व्यतिरिक्त संवैधानिक लेखापरिक्षक व त्यांचे सहाय्यकांचा प्रवास खर्च, स्थानिक प्रवास खर्च स्टेशनरी खर्च, निवास खर्च, चहापाणी व अल्पोपहार खर्च, भोजन खर्च इ. खर्च यापुर्वी प्रमाणेच महामंडळाकडून करण्यांत येईल.

उपरोक्त प्रमाणे सन २०२०-२१ साठी एकुण रु. २,२०,९७४/- (अक्षरी दोन लक्ष विस हजार नऊशे चौऱ्यात्तर मात्र) चे लेखापरीक्षण शुल्क व तसेच लेखापरीक्षकांचा स्थानिक प्रवास खर्च, स्टेशनरी खर्च, निवास खर्च, चहापाणी व अल्पोपहार खर्च इ. खर्च संवैधानिक लेखापरिक्षणासाठी करण्यांस संचालक मंडळाच्या मान्यतेस सादर.

**ठराव क्र.४ :- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे टॅक्स ऑडीट (Tax Audit) करण्यासाठी स्वतंत्रपणे सनदी लेखापालाची नेमणुक करण्यात आलेली नाही. आयकर कायदा,१९६१ नुसार Tax Audit करुन घेणे बंधनकारक असल्याने शबरी महामंडळाच्या स्थापनेपासुन संवैधानिक लेखापरिक्षकाकडुन Tax Audit करुन घेण्यात येते. त्यासाठी लेखापरीक्षण शुल्काच्या सरासरी १५% अदा करण्यात येते. करीता काम्प्ट्रोलर अँड ऑडीटर जनरल, नवी दिल्ली यांनी नेमणुक केलेले एल.के.सराफ, सनदी लेखापाल, नाशिक (WR2043) या संवैधानिक लेखापरिक्षकाच्या सन २०२०-२१ साठी रु. २,२०,९७४/- (अक्षरी दोन लक्ष विस हजार नऊशे चौऱ्यात्तर मात्र) चे लेखापरीक्षण शुल्क व तसेच लेखापरीक्षकांचा स्थानिक प्रवास खर्च, स्टेशनरी खर्च, निवास खर्च, चहापाणी व अल्पोपहार खर्चास मंजुरी देण्यात येत आहे.**

**सुचक** :- मा. आयुक्त, आदिवासी विकास महाराष्ट्र राज्य, नाशिक
**अनुमोदक** :- मा. रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

**विषय क्र.५- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., मुख्य कार्यालय, नाशिक यांच्या केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेतंर्गत संयुक्त दायित्व गटांच्या माध्यामातुन पथदर्शी दुग्ध विकास प्रकल्प योजनेचा निधी स्वतंत्र बँक खात्यात ठेवण्यासाठी युनियन बँक ऑफ इंडिया, शाखा - नाशिक सिटी, नाशिक येथे उघडण्यात आलेल्या खात्यास मान्यता मिळणेबाबत.**

शासन पत्र क्र.न्युबयो-२०२३/प्र.क्र.३४/का.९ आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक २३/०३/२०२३ मधील अ नुसार - केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेतंर्गत संयुक्त दायित्च गटांना दुधाळ जनावरे पालन करणे, योजना प्रकल्प अधिकारी डहाणु, जव्हार, धुळे, नंदुरबार व कळवण या प्रकल्पात पथदर्शी स्वरुपात शबरी आदिवासी महामंडळ मार्फत राबविण्यात यावी, असे नमुद केलेले आहे.

शासन निर्णय क्र. बीयुडी -२०२२/प्र.क्र.०२/कार्यासन-६ आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक २९/०३/२०२३ मधील मुद्दा क्र.३ नुसार - सदर योजना शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ, नाशिक यांच्यामार्फत राबविण्यात येत असल्याने सदर वितरीत निधी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ, नाशिक यांना उपलब्ध करुन द्यावा, असे नमुद आहे.

त्याअनुषंगाने मा. आयुक्त कार्यालयाकडुन रक्कम रु. १५९,३०,५०,०००/- (अक्षरी एकशे एकोणसाठ कोटी तीस लाख पन्नास हजार मात्र) हा शबरी महामंडळाचे नियमीत खाते क्र. २००४६६१५९५६ येथे दिनांक ३१/०३/२०२३ रोजी जमा झालेला आहे.

पथदर्शी दुग्ध विकास प्रकल्प योजनेचा निधी रक्कम रु. १५९,३०,५०,०००/- याचा स्वतंत्र हिशोब ठेवण्याच्या दृष्टिने खालील तपशिलाप्रमाणे नवीन बचत खाते उघडण्यात आलेले आहे.

बँकेचे नाव :- युनियन बँक ऑफ इंडिया, शाखा - नाशिक सिटी, नाशिक

IFSC Code - UBIN0532380

सेव्हिंग खाते क्र. ३२३८०२०११०१५४५७

शबरी महामडळाचे बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा कॅनडा कॉर्नर, नाशिक येथुन पथदर्शी दुग्ध विकास प्रकल्प योजनेचा निधी रक्कम रु. १५९,३०,५०,०००/- हा युनियन बँक ऑफ इंडिया, शाखा - नाशिक सिटी, नाशिक येथील खाते क्र. 323802011015457 वर दिनांक ०३/०४/२०२३ रोजी वर्ग करण्यात आलेला आहे.

उपरोक्त प्रमाणे युनियन बँक ऑफ इंडिया, शाखा - नाशिक सिटी, नाशिक या बँकेत शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ, नाशिक यांचे उघडण्यात आलेल्या बचत खात्याच्या कार्यवाहीस मंजुरी मिळावी.

**ठराव क्र.५ :- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळास पथदर्शी दुग्ध विकास प्रकल्प या योजनेचा प्राप्त झालेला निधी रक्कम रु. १५९,३०,५०,०००/- याचा स्वतंत्र हिशोब ठेवण्याच्या दृष्टिने युनियन बँक ऑफ इंडिया, शाखा - नाशिक सिटी, नाशिक येथे उघडण्यात आलेले खाते क्र. 323802011015457 यास कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे.**

**सुचक** :- मा. आयुक्त, आदिवासी विकास महाराष्ट्र राज्य, नाशिक
**अनुमोदक** :- मा. रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

**विषय क्र.६ :- शबरी महामंडळामार्फत एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत कर्ज योजनांसाठी प्राप्त निधीनुसार वाटप केलेल्या थकित कर्जाची देय असलेली रक्कम एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांना परतफेड करणेबाबत.**

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाची स्थापना शासनाचे आदिवासी विकास विभाग मंत्रालय, मुंबई. शासन निर्णय क्रमांक आविम-२३९६/४५/प्र.क्र.३९/ का-३ मुंबई दिनांक ९ डिसेंबर, १९९८ अन्वये महामंडळाची निर्मिती करण्यांत आलेली आहे. महामंडळाची नोंदणी कंपनी कायदा १९५६ अन्वये रजिस्टर ऑफ कंपनीज यांच्याकडे नोंदणी करण्यात आली असून कंपनीचा नोंदणी क्र.२५-१३२४७/१९९९ दिनांक १५ जानेवारी, १९९९ हा आहे. तसेच शबरी महामंडळाचा CIN No. U74210MH1999SGC118747 असा आहे.

शासन निर्णय क्र.आविम-२००४/प्र.क्र.१५/ का.३ दि.२४ ऑगस्ट, २००४ नुसार शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल रु.१०० कोटी वरुन रु.२०० कोटी इतके करण्यास मंजुरी देण्यात आलेली आहे. यापैकी ५१% भाग भांडवल वर्गणी राज्य शासनाची राहिल तर ४९% भाग भांडवल केंद्र शासनाकडून उभारावयाचे आहे. त्या अनुसार राज्य शासनाने रु.१०२ कोटी तर केंद्र शासनाने रु.९८ कोटी इतके भाग भांडवल भरणा करावयाचे आहे.

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळास शासन निर्णय क्र.शाहमी-२०१९/प्र.क्र.५७/अर्थबळ दि.०९ सप्टेंबर, २०१९ अन्वये एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत योजनेसाठी पुढील ५ वर्षासाठी रक्कम रु.५० कोटीची शासन हमी मिळालेली आहे. त्यानुसार एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांचेकडून शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळास नविन कर्ज वाटपसाठी रक्कम रु.११,७५,५६,०००/- रक्कम प्राप्त झालेली असुन सदर प्राप्त निधीनुसार विविध कर्ज योजनांसाठी कर्ज वाटप करण्यांत आलेले आहे.

सद्यस्थितीत एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांचेकडून सदर वाटप केलेल्या कर्ज रकमेचे परतफेड करणे बाबत तगादा सुरु आहे. एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांचेकडील पत्र क्र.NSTFDC/FIN/LOAN/SAVVMM/२५५६ दि.३१/१२/२०२२ नुसार माहे डिसेंबर, २०२२ अखेर रक्कम रु.३,५८,०३,४८१/- परतफेड करणेबाबत मागणी केलेली आहे. सदर रक्कमेची परतफेड वेळवेर न केल्यामुळे नवीन योजनांसाठी निधी मिळणे अडचणीचे होत आहे.

शासन पत्र क्र.शविमं-१११४/प्र.क्र.५०/का.३ आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ दि.१४ मार्च, २०१९ चे शासन पत्रान्वये शबरी महामंडळाकडील संचित नफ्यामधून शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाकडे दिनांक ३१/०३/२०१९ रोजी एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांना देय बाकी असलेल्या कर्ज रकमेपोटी दिनांक ३१/०३/२०१८ रोजी देणे बाकी असलेली रक्कम रु.२४,६३,३२,५८९/- वर्ग केलेली आहे. व शबरी महामंडळाने एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांचेकडून घेतलेले जुने कर्ज NIL केलेले आहे.

त्यानुसार संबंधित लाभार्थ्यांच्या कर्ज खात्यावर कोणताही परिणाम झालेला नसुन त्यांच्याकडून येणे असलेली कर्ज वसुली रक्कम वेळोवेळी वसुल करण्यांची कार्यवाही सुरु आहे. एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांना देय असलेली रक्कम यापुर्वीच संचित नफ्यातून दिलेली असल्याने सद्यस्थितीत सदर खाते NIL केल्यानंतर शबरी महामंडळाकडे आज अखेर लाभार्थ्यांकडून कर्ज वसुलीची रु.७१,६५,५१५/- रक्कम जुन्या कर्ज वसुलीची जमा झालेली आहे.

तसेच शासन निर्णय क्र.शाहमी-२०१९/प्र.क्र.५७/अर्थबळ दि.०९ सप्टेंबर, २०१९ अन्वये शासन थकहमी मिळाल्यानंतर एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांचेकडून शबरी महामंडळास नविन कर्ज वाटपसाठी दि.३०/०३/२०२० रोजी रक्कम रु.११,७५,५६,०००/- प्राप्त झालेली होती. मात्र सर्वत्र कोविड-१९ सदृश परिस्थिती निर्माण

झाल्याने सर्वत्र लॉकडाऊन घोषित झाल्यामुळे लॉकडाऊन शिथील झाल्यानंतर विविध कर्ज योजनांसाठी अर्ज सादर करण्यांस वेळोवेळी जाहिरात प्रसिद्ध करुन दि.३१/०१/२०२१ पर्यंत अर्ज सादर करण्यांस कळविण्यांत आले होते. त्यानुसार सदर कालावधीत मुदत ठेव स्वरुपात गुंतवलेल्या सदरच्या रकमेवर रु.७९,९१,८३२/- मात्र व्याज प्राप्त झालेले आहे.

उपरोक्त नमुद केल्यानुसार एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांना आज अखेर देय असलेल्या रक्कम रु.३,५८,०३,४८१/- पैकी शबरी महामंडळाकडे एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांचेकडून प्राप्त झालेल्या रकमेवरील मुदतठेव स्वरुपात महामंडळास प्राप्त झालेल्या व्याजाची रक्कम पुर्णांकात ७९,९२,०००/- व शबरी महामंडळाकडे जमा असलेली लाभार्थ्यांकडील जुनी कर्ज वसुलीची रक्कम रुपये रु.७१,६५,५१५/- असे एकत्रित रक्कम रु.१,५१,५७,५१५/- एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांना परतफेड करण्यास मान्यता मिळणेकामी तसेच शबरी महामंडळाकडे यापुढेही दरमहा जमा होणारी जुनी कर्ज वसुली एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांना थकबाकीपोटी देय असलेल्या रक्कमेसाठी वर्ग करणेकामी मा.व्यवस्थापकीय संचालक यांना अधिकार देण्यासाठी या कार्यालयाचे पत्र क्र.जा.क्र.शआविविम/प्रकल्प/प्रशा/४७/२०२३ नाशिक दि.१८/०१/२०२३ अन्वये शासनास प्रस्तावित करण्यांत आलेले आहे. सदर विषयास मंजुरी मिळणेकामी विषय मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी सादर केला आहे.

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

**ठराव क्र.६ :- एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांना आज अखेर देय असलेल्या रक्कम रु.३,५८,०३,४८१/- पैकी शबरी महामंडळाकडे एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांचेकडून प्राप्त झालेल्या रकमेवरील मुदतठेव स्वरुपात महामंडळास प्राप्त झालेल्या व्याजाची रक्कम पुर्णांकात ७९,९२,०००/- व शबरी महामंडळाकडे जमा असलेली लाभार्थ्यांकडील जुनी कर्ज वसुलीची रक्कम रुपये रु.७१,६५,५१५/- असे एकत्रित रक्कम रु.१,५१,५७,५१५/- एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांना परतफेड करण्याच्या सर्व प्रक्रीयेस सर्वानुमते कार्योतर मंजुरी देण्यांत येत आहे. तसेच शबरी महामंडळाकडे यापुढेही दरमहा जमा होणारी जुनी कर्ज वसुली एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांना थकबाकीपोटी देय असलेल्या रक्कमेसाठी वर्ग करणेकामी मा.व्यवस्थापकीय संचालक यांना अधिकार देण्यांत येत आहे.**

**सुचक** :- मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक
**अनुमोदक** :- मा.श्रीमती नयना गुंडे, आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक

**विषय क्र.७:- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत दि.३१.०३.२०२० अखेर करण्यांत आलेल्या कर्ज वाटपाचा कर्जमाफीचा प्रस्ताव सादर करणे बाबत.**

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाची स्थापना शासनाचे आदिवासी विकास विभाग मंत्रालय, मुंबई. शासन निर्णय क्रमांक आविम-२३९६/४५/प्र.क्र.३९/ का-३ मुंबई दिनांक ९ डिसेंबर, १९९८ अन्वये महामंडळाची निर्मिती करण्यांत आलेली आहे. महामंडळाची नोंदणी कंपनी कायदा १९५६ अन्वये रजिस्टर ऑफ कंपनीज यांच्याकडे नोंदणी करण्यात आली असून कंपनीचा नोंदणी क्र.२५-१३२४७/१९९९ दिनांक १५ जानेवारी, १९९९ हा आहे. तसेच शबरी महामंडळाचा CIN No. U74210MH1999SGC118747 असा आहे.

शासन निर्णय क्र.आविम-२००४/प्र.क्र.१५/ का.३ दि.२४ ऑगस्ट, २००४ नुसार शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल रु.१०० कोटी वरुन रु.२०० कोटी इतके करण्यास मंजुरी देण्यात आलेली आहे. यापैकी ५१% भाग भांडवल वर्गणी राज्य शासनाची राहिल तर ४९% भाग भांडवल केंद्र शासनाकडून

उभारावयाचे आहे. त्या अनुसार राज्य शासनाने रु.१०२ कोटी तर केंद्र शासनाने रु. ९८ कोटी इतके भाग भांडवल भरणा करावयाचे आहे.

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक यांचेमार्फत महामंडळाच्या स्थापनेपासुन आदिवासी लाभार्थ्यांना स्वयंरोजगारासाठी अल्प व्याजदराने एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत विविध कर्ज योजना, राष्ट्रीयकृत बँक योजना, स्वनिधी कर्ज योजना वेळावेळी राबविण्यांत आलेल्या आहेत.

शासन निर्णय क्र.कमायो-२००९/प्रक्र.५२/का.३ आदिवासी विकास विभाग, मुंबई दिनांक-८ डिसेंबर, २००९ व शासन पत्र क्र.कमायो-२०११/प्रक्र.७१/का.३ आदिवासी विकास विभाग, मुंबई दिनांक-१ ऑगष्ट २०११ अन्वये शासनाने शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिकचे मार्फत राबविण्यात येणाऱ्या स्वयंरोजगार योजनांची लाभार्थीचे दिनांक-३१.०३.२००८ अखेर थकीत असलेल्या कर्जास माफी दिलेली आहे.

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या संचालक मंडळाचे दिनांक-३०.०५.२०१२ चे सभेतील टराव क्र.-२ अन्वये शासन निर्णयाप्रमाणे कर्ज माफी रक्कम रु.२३,२६,९४२९३/- व्याजा सहीत मंजुरी देण्यात आली आहे.

शाखा कार्यालयांनी त्यांच्या लेखेतील हिशोबी नोंदी नुसार दि.३१.०३.२००८ रोजी थकीत कर्ज यादी तयार करुन सनदी लेखापाल यांचेकडुन हिशोब पुर्ण करुन घेण्यात आलेली आहेत. त्यानुसार व शासन निर्णयास अनुसरुन शाखा कार्यालयांचे एन.एस.टी.एफ.डी.सी. व राष्ट्रीयकृत बँक मार्जीन मनी योजनांचे थकीत रकमेच्या लाभार्थ्यांचे कर्ज माफीस या कार्यालयाचे आदेश क्र.शआविविम/प्रकल्प/कर्ज माफी/१५२९/२०१२ नाशिक दि.१ ऑक्टोंबर २०१२ अन्वये खालीलप्रमाणे मंजुरी देण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| १ | दि. ३१/०३/२००८ अखेर एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली व राष्ट्रीयकृत बँक यांची थकीत कर्जमाफीची मुददल रक्कम | १८,१५,५२,०५१ |
| २ | दि. ३१/०३/२००८ अखेर थकीत कर्जा वरील व्याजाची रक्कम | ५,११,४२,२४२ |
| | **एकुण** | **२३,२६,९४,२९३** |

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे सन २०१९-२० चे लेखे तयार झालेले असुन सदरच्या वर्षाचे मा.प्रधान महालेखाकार कार्यालय, नवी दिल्ली यांचेकडून नियुक्त झालेले साबद्रा ॲण्ड साबद्रा, सनदी लेखापाल, नाशिक यांचे मार्फत संवैधानिक लेखापरीक्षण झालेले आहे. करीता कर्ज माफीचा प्रस्ताव करतांना सन २०१९-२० चे आकडेवारी घेण्यांत आलेली आहे.

**दिनांक ३१/०३/२०२० अखेर कर्ज येणे रक्कम (जुने कर्ज वाटप)**

| अ.क्र. | शाखा कार्यालयाचे नाव | दिनांक ३१/०३/२०२० अखेर एकुण लाभार्थी | दिनांक ३१/०३/२०२० अखेर कर्ज येणे रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १ | चंद्रपुर | २१८ | २,२२,१८,०४२/- |
| २ | देवरी | २०० | ३,१६,३३,९२३/- |
| ३ | धारणी | २०२ | २,५६,७२,११२/- |
| ४ | गडचिरोली | २२४ | २,४५,९८,४२१/- |
| ५ | मुख्य कार्यालय नाशिक | ०२ | १२,७१०/- |
| ६ | जव्हार | २५४ | २,३३,४१,१३२/- |
| ७ | जुन्नर | ५१५ | १०,७३,१०,०१८/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | किनवट | २४१ | २,९९,६७,२५४/- |
| ९ | नागपुर | ३५० | २,३९,५१,८७२/- |
| १० | नंदुरबार | ११४३ | २६,१६,९५,९६२/- |
| ११ | नाशिक | १०१८ | १५,१९,७६,७१८/- |
| १२ | यावल | १५६ | १,६७,५३,२१८/- |
| १३ | यवतमाळ | ६२७ | ९,१२,५२,०४०/- |
| | **एकुण** | **५१५०** | **८१,०३,८३,४२९/-** |

**वसुलीचे प्रमाण अत्यल्प असल्याने महामंडळाकडून कर्ज वसुली वाढविणेकामी करण्यांत येणाऱ्या उपाययोजना खालीलप्रमाणे-**

१) थकित कर्जदार लाभार्थ्यांना वसुलीसाठी प्रत्यक्ष भेट देणे.
२) थकित कर्जदार लाभार्थ्यांना वसुलीसाठी वेळावेळी पत्रव्यवहार करणे.
३) थकित कर्जदार लाभार्थ्यांना वसुली भरणेकामी लाभार्थी व जामीनदार यांना नोटीसा देणे.
४) थकित कर्जदार लाभार्थ्यांना कायदेशीर नोटीस देणे.
५) जामिनदाराच्या नावाने नोटिस देऊन कर्ज वसुलीसाठी प्रयत्न करणे.
६) थकित कर्जदार लाभार्थ्यांना चेक बाऊन्स करुन कायदेशीर नोटीस देणे.
७) नोटीस देऊन कोर्ट केस दाखल करणे.

**वसुली न होण्याची कारणे-**

१) सन २०२०-२०२१ मध्ये सर्वत्र कोविड सदृश परिस्थिती असल्याने आदिवासी बांधवांची आर्थिक परिस्थिती खालावली असल्याने त्यांचे रोजगार साधन उपलब्ध नसल्याने कर्ज भरणा करण्यांत आला नसल्याने वसुलीचे प्रमाण अत्यल्प असल्याचे दिसून येत आहे.
२) लोकप्रतिनिधीची मागणी, दुष्काळ, अतिवृष्टी या तीन कारणांमुळे कर्ज परतफेड झाली नाही.
३) यापुर्वी महाराष्ट्र शासनाने दुष्काळ व अतिवृष्टी च्या कारणास्तव राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी केली आहे. त्याअनुषंगाने राज्यातील आदिवासी बांधवांकडून देखील कर्जमाफी मिळावी, याअनुषंगाने संबंधित शाखा व्यवस्थापकांकडे याबाबत वेळोवेळी कर्जमाफीची मागणी केली जाते.

उपरोक्त तपशिलात नमुद केल्यानुसार शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत यापुर्वी करण्यांत आलेल्या विविध कर्ज योजनांच्या थकित रक्कम रु.८१,०३,८३,४२९/- याबाबत मुद्दल व व्याजनिहाय तपशिलवार माहिती यथावकाश शासनास सादर करण्यात येईल. करीता शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाची दिनांक ३१/०३/२०२० अखेरची थकित रक्कम रु.८१,०३,८३,४२९/- ची कर्जमाफी मिळणेकामी शासनास या कार्यालयाचे पत्र क्र.जा.क्र.शआविविम/प्रकल्प/प्रशा/०९/२०२३ नाशिक दि.०४/०१/२०२३ अन्वये प्रस्ताव सादर करण्यांत आलेला आहे.

सद्यस्थितीत शबरी महामंडळाचे लेखे सन २०१९-२० पर्यंत पूर्ण झालेले असल्याने सदर प्रस्तावात बदल होऊ शकतो. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाकडून धोरणात्मक बदल झाल्यास तसेच आवश्यक त्या बदलासह राज्य शासनास कर्ज माफीचा फेरप्रस्ताव सादर करणेकामी मा.व्यवस्थापकीय संचालक यांना अधिकार देणेसाठी सदर विषय मा.संचालक मंडळाचे मान्यतेस्तव सादर केला आहे.

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

**ठराव क्र.७ :- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत दि.३१.०३.२०२० अखेर करण्यांत आलेल्या कर्ज वाटपाचा कर्जमाफीच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाकडून धोरणात्मक बदल झाल्यास तसेच आवश्यक त्या बदलासह राज्य शासनास कर्ज माफीचा फेरप्रस्ताव सादर करणेकामी मा.व्यवस्थापकीय संचालक यांना अधिकार देण्यांत येत आहे.**

**सुचक** :- मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक
**अनुमोदक** :- मा.श्रीमती नयना गुंडे, आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक

**विषय क्र.८ - शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे भागभांडवल रक्कम रुपये २००/- कोटी वरुन ५००/- कोटी करणे बाबत.**

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाची स्थापना शासनाचे आदिवासी विकास विभाग मंत्रालय, मुंबई. शासन निर्णय क्रमांक आविम-२३९६/४५/प्र.क्र.३९/ का-३ मुंबई दिनांक ९ डिसेंबर, १९९८ अन्वये महामंडळाची निर्मिती करण्यांत आलेली आहे. महामंडळाची नोंदणी कंपनी कायदा १९५६ अन्वये रजिस्टर ऑफ कंपनीज यांच्याकडे नोंदणी करण्यात आली असून कंपनीचा नोंदणी क्र.२५-१३२४७/१९९९ दिनांक १५ जानेवारी, १९९९ हा आहे. तसेच शबरी महामंडळाचा CIN No. U74210MH1999SGC118747 असा आहे.

शासन निर्णय क्र.आविम-२३९६/४५/प्र.क्र.३९/का.३ मुंबई दि.९ डिसेंबर, १९९८ नुसार शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या संचालक मंडळाची रचना खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | हुद्या |
|---|---|---|
| १. | मा.मंत्री, आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई-३२ | अध्यक्ष |
| २. | मा.राज्यमंत्री, आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई-३२ | उपाध्यक्ष |
| ३. | मा.सचिव, (भा.प्र.से.)<br>आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ | संचालक |
| ४. | मा.उप सचिव<br>आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई-३२ | संचालक |
| ५. | मा.आयुक्त, (भा.प्र.से.)<br>आदिवासी विकास, महराष्ट्र राज्य, नाशिक | संचालक |
| ६. | मा.व्यवस्थापकीय संचालक (भा.प्र.से.)<br>शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या, नाशिक | संचालक |

शासन निर्णय क्र.आविम-२००४/प्र.क्र.१५/ का.३ दि.२४ ऑगस्ट, २००४ नुसार शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल रु.१०० कोटी वरुन रु.२०० कोटी इतके करण्यास मंजुरी देण्यात आलेली आहे. यापैकी ५१% भाग भांडवल वर्गणी राज्य शासनाची राहिल तर ४९% भाग भांडवल केंद्र शासनाकडून उभारावयाचे आहे. त्यानुसार राज्य शासनाने रु.१०२ कोटी तर केंद्र शासनाने रु. ९८ कोटी इतके भाग भांडवल भरणा करावयाचे आहे.

उपरोक्त निर्णयानुसार दि.३१.०३.२०२२ अखेर पर्यंतची प्राप्त भागभांडवलाचा तपशिल खालील प्रमाणे.

(रु.लक्ष)

| अ.क्र. | दि.३१/०३/२०२२ अखेर | ५१% राज्य शासन हिस्सा (रु.१०२.०० कोटी) | ४९% केंद्र शासन हिस्सा (रु.९८.०० कोटी) | १००% हिस्सा |
|---|---|---|---|---|
| | | महामंडळास प्राप्त रक्कम | महामंडळास प्राप्त रक्कम | एकूण |
| १ | एकूण रक्कम रुपये | ८३५९.२१ | ४५२.९७ | ८८१२.१५ |

उपरोक्त तपशिलात नमुद केल्याप्रमाणे राज्य शासनाकडून ५१% हिस्स्याप्रमाणे (१०२.०० कोटी) रक्कम रुपये ८३५९.१८ लक्ष निधी प्राप्त झालेला असुन रक्कम रुपये १८,४०,७९,०००/- अप्राप्त आहे. त्यानुसार या कार्यालयाकडून सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाकरीता भागभांडवल हिस्स्यापोटी राज्य शासनाकडून तरतूद केल्याप्रमाणे रुपये ५.०० कोटी मागणी करण्यांत आलेली आहे. त्याअनुषंगाने उर्वरित रक्कम रुपये १३४०.७९ लक्ष रक्कम राज्य शासनास आर्थिक वर्ष सन २०२३-२४ साठी प्रस्तावित नियतव्यया बाबत प्रारुप आराखडा तयार करण्यासाठी या कार्यालयाकरीता (लेखाशिर्ष ४४२५-०६८८ भागभांडवली खर्च) प्रस्ताव सादर करण्यांत आला आहे.

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत आदिवासी समाजातील बांधवांसाठी स्वयंरोजगाराच्या उद्देशाने विविध योजना राबविण्यांत येतात. सदर योजनांकरीता महामंडळातर्फे मार्जिन मनी उपलब्ध करुन देण्यांत येतो. सद्यस्थितीत शबरी महामंडळातील राज्य शासनाची भागभांडवल हिस्साच्या निधीची मर्यादा संपुष्टात येणार आहे.

परिणामी नवीन योजना राबवितांना शबरी महामंडळाचा मार्जिन मनी हिस्सा अडचणीचा होणार आहे. शबरी महामंडळाला यापुर्वी शासन निर्णय क्र.आविम-२००४/प्र.क्र.१५/ का.३ दि.२४ ऑगस्ट, २००४ अन्वये रक्कम रुपये १००.०० कोटी वरुन रक्कम रुपये २००.०० कोटी मर्यादा वाढविण्यांत आलेली आहे.

त्याअनुषंगाने शबरी महामंडळाचे भागभांडवल रक्कम रुपये २००.०० कोटी वरुन रक्कम रुपये ५००.०० कोटी मर्यादा वाढवून मिळावी. सदरचे भांगभांडवल रक्कम महामंडळामार्फत राबविण्यांत येणाऱ्या विविध योजनांमधील शबरी महामंडळाचा मार्जीन मनी हिस्सा म्हणून वापरण्यांत येईल. तसेच शबरी महामंडळातील पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी तसेच भांडवली खर्चासाठी करण्यांत येईल. सदरचा भागभांडवली हिस्सा शासन निर्णय क्र.आविम-२००४/प्र.क्र.१५/ का.३ दि.२४ ऑगस्ट, २००४ चे शासन निर्णयात नमुद केल्यानुसार टप्प्या टप्प्याने महामंडळास मिळावा.

उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे शबरी महामंडळाचे भागभांडवल रक्कम रुपये २००.०० कोटी वरुन रक्कम रुपये ५००.०० कोटी मर्यादा वाढविणेकामी कंपनी कायद्यानुसार ROC (Registrar of Company) वर नोंद करणेकामी प्रचलित दरानुसार जवळपास रक्कम रुपये २.७० कोटी (रु.१०० कोटी साठी ९०.०० लक्ष याप्रमाणे) फी भरणा करावी लागेल. सदरची भरणा करावयाची फी व्यवस्थापकीय अनुदानातून (लेखाशिर्ष २४२५-१३५९) भागविता येईल.

उपरोक्त नमुद केल्यानुसार राज्य शासनाने जर महामंडळास भागभांडवल भागभांडवल रक्कम रुपये २००.०० कोटी वरुन रक्कम रुपये ५००.०० कोटी मर्यादा वाढविल्यास केंद्र शासनाचा महामंडळास प्राप्त होणारा हिस्सा मध्ये देखिल वृध्दी होईल. त्यामुळे शबरी महामंडळाचे सक्षमीकरणास मदत होईल.

करीता शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे भागभांडवल रक्कम रुपये २००.०० कोटी वरुन ५००.०० कोटी करणेसाठी तसेच सदरकामी ROC वर नोंद करणेकामी आवश्यक असलेल्या फी करीता

जवळपास रक्कम रु.२.७० कोटी व्यवस्थापकीय अनुदानातून (लेखाशिर्ष २४२५-१३५९) भरणेकामी व्यवस्थापकीय संचालक यांना अधिकार देण्याचे मा.संचालक मंडळाच्या मान्यतेस सादर.

सदर विषयास मंजुरी मिळणेकामी विषय मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी सादर केला आहे.

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

**ठराव क्र.८ :- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे भागभांडवल रक्कम रुपये २००.०० कोटी वरुन ५००.०० कोटी करणेसाठी तसेच सदरकामी ROC वर नोंद करणेकामी आवश्यक असलेल्या फी करीता जवळपास रक्कम रु.२.७० कोटी व्यवस्थापकीय अनुदानातून (लेखाशिर्ष २४२५-१३५९) भरणेकामी व्यवस्थापकीय संचालक यांना अधिकार अधिकार देण्यांत येत आहे.**

**सुचक** :- मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक

**अनुमोदक** :- मा.रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

**विषय क्र.९- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत विविध योजना राबविणेसाठी स्वतंत्र लेखाशिर्ष उघडणेबाबत.**

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाची स्थापना शासनाचे आदिवासी विकास विभाग मंत्रालय, मुंबई. शासन निर्णय क्रमांक आविम-२३९६/४५/प्र.क्र.३९/ का-३ मुंबई दिनांक ९ डिसेंबर, १९९८ अन्वये महामंडळाची निर्मिती करण्यांत आलेली आहे. महामंडळाची नोंदणी कंपनी कायदा १९५६ अन्वये रजिस्टर ऑफ कंपनीज यांच्याकडे नोंदणी करण्यात आली असून कंपनीचा नोंदणी क्र.२५-१३२४७/१९९९ दिनांक १५ जानेवारी, १९९९ हा आहे. तसेच शबरी महामंडळाचा CIN No. U74210MH1999SGC118747 असा आहे.

शासन निर्णय क्र.आविम-२३९६/४५/प्र.क्र.३९/का.३ मुंबई दि.९ डिसेंबर, १९९८ नुसार शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या संचालक मंडळाची रचना खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | हुद्दा |
|---|---|---|
| १. | मा.मंत्री, आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई-३२ | अध्यक्ष |
| २. | मा.राज्यमंत्री, आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई-३२ | उपाध्यक्ष |
| ३. | मा.सचिव, (भा.प्र.से.)<br>आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ | संचालक |
| ४. | मा.उप सचिव<br>आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई-३२ | संचालक |
| ५. | मा.आयुक्त, (भा.प्र.से.)<br>आदिवासी विकास, महराष्ट्र राज्य, नाशिक | संचालक |
| ६. | मा.व्यवस्थापकीय संचालक (भा.प्र.से.)<br>शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या, नाशिक | संचालक |

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळास सद्यस्थितीत व्यवस्थापकीय अनुदान २४२५-१३५९ आणि भागभांडवल लेखाशिर्ष ४४२५-०६८८ असे एकूण ०२ लेखाशिर्ष आहेत. व्यवस्थापकीय अनुदान २४२५-१३५९

या लेखाशिर्षातून शबरी महामंडळातील व्यवस्थापकीय अनुदानातून वेतन व इतर तद्अनुषंगिक भत्त्यांसाठी खर्च भागविण्यांत येतो.

शासन निर्णय क्र.आविम-२००४/प्र.क्र.१५/ का.३ दि.२४ ऑगस्ट, २००४ नुसार शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल रु.१०० कोटी वरुन रु.२०० कोटी इतके करण्यास मंजुरी देण्यात आलेली आहे. यापैकी ५१% भाग भांडवल वर्गणी राज्य शासनाची राहिल तर ४९% भाग भांडवल केंद्र शासनाकडून उभारावयाचे आहे. त्यानुसार राज्य शासनाने रु.१०२ कोटी तर केंद्र शासनाने रु. ९८ कोटी इतके भाग भांडवल भरणा करावयाचे आहे.

उपरोक्त निर्णयानुसार दि.३१.०३.२०२२ अखेर पर्यंतची प्राप्त भागभांडवलाचा तपशिल खालील प्रमाणे.

(रु.लक्ष)

| अ.क्र. | दि.३१/०३/२०२२ अखेर | ५१% राज्य शासन हिस्सा महामंडळास प्राप्त रक्कम | ४९% केंद्र शासन हिस्सा महामंडळास प्राप्त रक्कम | १००% हिस्सा एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | एकूण रक्कम रुपये | ८३५९.२१ | ४५२.९७ | ८८१२.१५ |

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक यांचेमार्फत महामंडळाच्या स्थापनेपासुन आदिवासी लाभार्थ्यांना स्वयंरोजगारासाठी अल्प व्याजदराने एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत विविध कर्ज योजना राबविण्यांत येत असुन त्या माध्यमातून आदिवासी लाभार्थ्यांना स्वयंरोजगारासाठी अल्प व्याजदराने कर्ज योजनांचा लाभ देण्यांत आलेला आहे. सद्यस्थितीत सन २०१९-२० पासून विविध नाविन्यपूर्ण योजना तसेच विशेष केंद्रिय सहाय्य योजना राबविण्यांत येत आहेत. याशिवाय शबरी महामंडळामार्फत कोणतीही स्वतंत्र योजना राबविण्यांत येत नाहीत.

तसेच शासन पत्र क्र.आविवि-२०१९/प्र.क्र.१८/का.०३ मंत्रालय, मुंबई दि.२०/०१/२०२३ चे शासन पत्रान्वये स्टँण्ड अप इंडिया योजना अंतर्गत मंजुर लाभार्थ्यांना वितरीत करावयाच्या निधीसाठी स्वतंत्र लेखाशिर्ष उघडणेकामी शासनास प्रस्ताव सादर करण्याचे कळविण्यांत आलेले आहेत. त्याअनुषंगाने शबरी महामंडळास स्वतंत्र योजना राबविणेकामी तसेच स्टँण्ड अप इंडिया योजना राबविणेसाठी आवश्यक असलेला निधी करीता अर्थसंकल्पात तरतूद करुन वेळोवेळी स्वतंत्र निधी प्राप्त होणेकरीता शबरी महामंडळास लेखाशिर्ष उपलब्ध करुन देण्यांत यावे.

सदरचे स्वतंत्र लेखाशिर्ष अंतर्गत निधी प्राप्त झाल्यास शबरी महामंडळाकडून महाराष्ट्र राज्यातील आदिवासी लाभार्थ्यांसाठी विविध कर्जाच्या / अनुदानाच्या योजना राबविण्यांत येतील. सद्यस्थितीत महात्माफुले महामंडळ, अण्णाभाऊ साठे महामंडळ, यासारख्या महामंडळामार्फत इच्छुक लाभार्थीना अनुदान तत्वावर कर्जाच्या योजना, मार्जिन मनी योजना राबविण्यांत येतात. त्याच धर्तीवर शबरी महामंडळामार्फत स्वयंरोजगारासाठी अनुसूचित जमातीचे इच्छुक लाभार्थ्यांना विविध कर्ज योजनांचा लाभ देता येईल. तसेच शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळा मार्फत एन.एस.टी.एफ.डी.सी.नवी दिल्ली कर्ज योजने अंतर्गत ज्या लाभार्थीनी त्यांना दिलेल्या कर्जाची नियमित हप्त्याने व वेळेवर परतफेड करतील, अशा लाभार्थ्यांना सदर लेखाशिर्षमधील प्राप्त निधीतून व्याज अनुदान देण्याचे नियोजन आहे.

शबरी महामंडळामार्फत राबविण्यांत येणाऱ्या योजनांसाठी स्वतंत्र लेखाशिर्ष उघडुन निधी उपलब्ध करुन दिल्यास ते अनुदान स्वरुपाचे होईल. त्यामुळे शबरी महामंडळामार्फत राबविण्यांत येणाऱ्या विविध योजनांचा लाभ लाभार्थ्यांना होणार आहे. करीता सदर विषय मा.संचालक मंडळाच्या मान्यतेस सादर.

सदर विषयास मंजुरी मिळणेकामी विषय मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी सादर केला आहे.

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

**ठराव क्र.९ :- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत विविध योजना राबविणेसाठी स्वतंत्र लेखाशिर्ष उघडून याबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्यांत यावा.**

**सुचक** :- मा.रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

**अनुमोदक** :- मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक

**विषय क्र.१० - केंद्र शासनाच्या स्टँड अप इंडिया योजनेत अनुसूचित जमातीच्या घटकांकरीता मंजुर लाभार्थींना मार्जिन मनी उपलब्ध करुन देण्याबाबत.**

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन सविनय सादर करण्यांत येते की, शासन निर्णय क्र.आविम-२०१९/प्र.क्र.१८/का.३ मंत्रालय, मुंबई दि.२० जून, २०१९ अन्वये केंद्र शासनाच्या स्टँड अप इंडिया योजने अंतर्गत महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित जमातीच्या नवउद्योजक लाभार्थींना एकूण प्रकल्प किंमतीच्या लाभार्थीच्या मंजुर रक्कम हिस्स्यामधील २५% मधील जास्तीत जास्त १५% मार्जीन मनी उपलब्ध करुन देणे बाबत (Front End Subsidy) संदर्भिय शासन निर्णय निर्गमित करण्यांत आलेला आहे. सदर शासन निर्णयात या योजनेकरीता शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या सध्या अस्तित्वात असलेल्या स्विय प्रपंजी लेखा खात्यात (PLA) शिल्लक असलेला निधी योजनेसाठी वितरीत करावा असे नमुद करण्यांत आले होते.

केंद्र शासनाच्या स्टँड अप इंडिया योजनेत अनुसूचित जमातीच्या घटकांकरीता मार्जिन मनी उपलब्ध करुन देण्याबाबत राज्य शासनाकडून शासन पत्र क्र.आविम-२०१९/प्र.क्र.१८/का.३ मंत्रालय, मुंबई-३२ दि.१४ ऑक्टोबर, २०२२ अन्वये उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने स्वयंस्पष्ट अभिप्रायासह प्रस्ताव सादर करणेबाबत कळविण्यांत आले मुख्य कार्यालयाचे पत्र क्र.जा.क्र.शआविविम/प्रकल्प/प्रशा/६१७/२०२२ नाशिक दि.१०/११/२०२२ अन्वये संबंधित शाखा कार्यालयांकडून अहवाल मागविण्यांत आला. सदर प्राप्त अहवालानुसार शासनाकडून उपस्थित केलेल्या मुद्यांबाबत अभिप्राय शासनास मुख्य कार्यालयाचे पत्र क्र.जा.क्र.शआविविम/प्रकल्प/प्रशा/६३४/२०२२ नाशिक दि.२५/११/२०२२ अन्वये सादर कण्यांत आला.

शासन पत्र क्र.आविवि-२०१९/प्र.क्र.१८/का.०३ मंत्रालय, मुंबई-३२ दि.२० जानेवारी, २०२३ अन्वये शासनाकडून खालील लाभार्थींचे प्रस्तावास मंजुरी देण्यांत आलेली आहे.

| अ.क्र. | लाभार्थीचे नाव | वितरीत करावयाचा निधी (लाखात) |
|---|---|---|
| १ | श्री.कुशल चंद्रशेकर मोवाडे, नागपूर | १२,२०,५५०/- |
| २ | श्रीमती प्रियंका जितेंद्र मोघे, यवतमाळ | १२,२०,५५०/- |
| ३ | श्रीमती वंदना संतोष टारफे, यवतमाळ | १२,२०,५५०/- |
| ४ | श्री.विशाल वामनराव अडे, यवतमाळ | १६,१७,०९८/- |
| ५ | श्री.सचिन साहेबराव खानंदे, अमरावती | १०,७८,०००/- |
| ६ | श्री.शंतनु सुनिल साळूंके, पुणे | १२,५४,९००/- |
| | **एकूण** | **७६,११,६४८/-** |

उपरोक्त तपशिलात नमुद लाभार्थ्यांना तसेच यापुढे स्टँड अप इंडिया योजनेचा लाभ देण्यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णय दि.०९ डिसेंबर, २०२० मधील नमुद मार्गदर्शक सुचनांचे पालन

करुन तपासणी करुन कार्यवाही करणेबाबत कळविण्यांत आले आहे. त्यानुसार संबंधीत लाभार्थ्यांना खालीलप्रमाणे सदर योजनेचा लाभ देण्यांत आलेला आहे.

| अ. क्र | प्रकल्प सादर करणाऱ्याचे नाव | अर्जदाराचा पूर्ण पत्ता | निवडण्यात आलेल्या व्यवसायाचा तपशील | प्रकल्पाची रक्कम (रु.) | कर्ज प्रकरण मंजूर केलेल्या बँकेचे नाव | प्रकल्प मूळ रकमेच्या 15 % प्रमाणे मार्जिन मनी (रु.) | अर्जदाराचे बँकेतील कर्ज खाते क्रमांक | आयएफसी कोड | या आदेशान्वये मंजूर करण्यात येणारी मार्जिन मनी रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| 1 | श्री.कुशल चंद्रशेकर मोवाडे | प्लॉट नं.51, गजानन नगर, नेलको सो. जवळ, परसोडी, नागपूर-440022 | एल.पी.जी. ट्रान्सपोर्ट | ७३,८७,०००/- | बँक ऑफ बडोदा शाखा कार्यालय नागपूर | ११,०८,०५०/- | A/C No. 33590600001002 | BARBOPRANAG | ११,०८,०५०/- |
| 2 | श्रीमती प्रियंका जितेंद्र मोघे | 13 राणा प्रताप नगर आर्णि रोड, यवतमाळ 445001 | एल.पी.जी. ट्रान्सपोर्ट | ७३,८७,०००/- | बँक ऑफ बडोदा शाखा यवतमाळ | ११,०८,०५०/- | A/C No. 04620400000411 | BARBOYEOTMA | ११,०८,०५०/- |
| 3 | श्रीमती वंदना संतोष टारफे | मु.नाईक नगर, हिंगोली | एल.पी.जी. ट्रान्सपोर्ट | ८१,३७,०००/- | बँक ऑफ बडोदा शाखा यवतमाळ | ११,०८,०५०/- | A/C No. 04620400000416 | BARBOYEOTMA | ११,०८,०५०/- |
| 4 | श्री.विशाल वामनराव अडे | मु.जसराना कॉम्प्लेक्स दारव्हा रोड, यवतमाळ 445001 (सुखकर्ता हॉटेल जवळ) | एल.पी.जी. ट्रान्सपोर्ट | १,०७,८०,६५०/- | बँक ऑफ बडोदा शाखा यवतमाळ | १६,१७,०९८/- | A/C No. 04620400000415 | BARBOYEOTMA | १६,१७,०९८/- |
| 5 | श्री.सचिन साहेबराव खानंदे | घनश्याम नगर, सातुर्ना, बडनेरा रोड, अमरावती | एल.पी.जी.टँकर खरेदी (ट्रान्सपोर्ट व्यवसाय) | ७१,८७,०००/- | बँक ऑफ बडोदा शाखा अमरावती | १०,७८,०००/- | A/C No. 04680600015341 | BARBOAMRAVA | १०,७८,०००/- |
| 6 | श्री.शंतनु सुनिल साळूंके | डी.38 वुडलँड, गांधी भवन रोड, क्युमिन्स फॅक्ट्रीच्या बाजुला, कोथरुड, पूणे. | एल.पी.जी. गॅस वाहतूक | ७६,१५,०००/- | बँक ऑफ बडोदा, शाखा सहकार नगर, पुणे | ११,४२,२५०/- | A/C No. 32150200000717 | BARBOSAHPUN | ११,४२,२५०/- |
| | | | | ४,८४,९३,६५०/- | | ७१,६१,४९८/- | | | ७१,६१,४९८/- |

उपरोक्त तपशिलात नमुद केल्यानुसार संबंधीत लाभार्थ्यांच्या खात्यात एकूण रक्कम रुपये ७१,६१,४९८/- (अक्षरी रक्कम रुपये एक्काहत्तर लक्ष एकसष्ठ हजार चारशे अठ्याणव मात्र) निधी वर्ग करण्यात आलेला असुन त्यास कार्योत्तर मंजुरी मिळणेकामी सदर विषय मा.संचालक मंडळाच्या मान्यतेस सादर.

सदर विषयास मंजुरी मिळणेकामी विषय मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी सादर केला आहे.

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

**ठराव क्र.१० :- केंद्र शासनाच्या स्टँड अप इंडिया योजनेच्या धोरणानुसार शासन पत्र क्र.आविवि-२०१९/प्र.क्र.१८/का.०३ मंत्रालय, मुंबई-३२ दि.२० जानेवारी, २०२३ अन्वये नमुद अ.क्र.१ ते ६ लाभार्थींना वाटप करण्यांत आलेल्या मार्जिन मनी / सबसिडी अदायगीस कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास सादर करण्यांत यावा.**

**सुचक** :- मा.श्रीमती नयना गुंडे, आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक

**अनुमोदक** :- मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक

**विषय क्र ११ : केंद्र शासनाच्या जनजाती कार्य मंत्रालय )Ministry of Tribal Affairs) यांचे मार्फत विशेष केद्रीय सहाय्य (SCA - Special Central Assistance) निधीअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनेच्या प्रगती बाबत...**

**११.१ Centre for Collective Development (CCD), Banglore यांचे मार्फत राबविण्यात येत असलेल्या "Formation of FPOs in Yavatmal District so as to leverage the benefits arising from collectivizing and to market the produce more efficiently or better price realization" योजनेची प्रगती सादर करणेबाबत...**

| 2 | 2019-20 | SCA | CCD NGO- formation of FPO(s) in Gadchiroli and Yavatmal so as to leverage the benefits arising from collectivizing and to market the produce more efficiently for better price realization | 2000.00 | 500.00 | 1500.00 |
| 3 | 2020-21 | CCD | EAGL-Goat Rearing for katkari tribes | 1050.00 | 951.66 | 98.34 |
| | | | **Total** | **4404.82** | **2071.66** | **2333.16** |

सदर प्रकल्प प्रभावीपणे राबविणे तसेच मंजूर उद्दिष्ट सध्या करणेसाठी निधीचा पुढच्या हप्ता उपलब्ध करून घेणे अत्यावश्यक आहे. या करिता मा. अपर मुख्य सचिव, आदिवासी विकास यांना दिनांक १४.०२.२०२३ रोजी निधीचा पुढचा हप्ता मिळणेबाबतची विनंती करण्यात आलेली आहे.

**ठराव क्र.१७ :- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्यादित नाशिक यांचेमार्फत विशेष केंद्रीय सहाय्य (SCA) व आदिम जमाती विकास (PVTGs) अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या योजनांचा निधीचा पुढचा हप्ता मिळणेसाठी शासन स्तरावर तात्काळ पाठपुरावा करावा. तसेच निधी प्राप्त होत नसेल तर विशेष केंद्रिय सहाय्य निधी अंतर्गत पडकई विकास योजनेचा अखर्चित निधी सदर योजनेकरीता वापरण्यांस सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे. याबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्याचे व यापुढील कार्यवाही करण्याचे व्यवस्थापकीय संचालक यांना सर्व अधिकार देण्यांत येत आहे.**

**सुचक :-** मा.व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक
**अनुमोदक :-** मा.श्री.रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई-३२

**विषय क्र. १८ :** **शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणेसाठी** Swaniti Initiative, New Delhi **यांची मदत घेण्याबाबत...**

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक याची दिनांक १५ जानेवारी १९९९ रोजी कंपनी कायदा १९५६ अंतर्गत स्थापना झाली. शबरी महामंडळ नाशिक, जुन्नर, जव्हार, नंदुरबार, यावल, यवतमाळ, किनवट, देवरी, धारणी, नागपूर, चंद्रपूर आणि गडचिरोली येथे असलेल्या शाखा कार्यालयांच्या माध्यमातून आदिवासींच्या उपजीविका वृद्धी करणेसाठी विविध सहाय्य योजना राबवते. "जन जल जंगल जमीन विकासाद्वारे आदिवासींचे सक्षमीकरण" हा उद्देश घेऊन शबरी महामंडळ कार्य करत आहे.

शबरी महामंडळामार्फत महाराष्ट्रातील आदिवासी बहुल भागात केंद्र शासनांतर्गत विशेष केंद्रीय सहाय्य (Special Central Assistance), भारतीय राज्य घटनेच्या परिच्छेद २७५(१) (Article 275(1), आदिम जमाती विकास (CCD/PVTGs), National Scheduled Tribes Finance Development Corporation (NSTFDC), किमान आधारभूत योजना (MSP for MFP), Honey & Wax Cluster Development, Start Up India इत्यादी निधींतर्गत विविध योजना राबविल्या जात आहेत. राज्य शासनाकडून प्राप्त निधीतून निसर्गोपचार (Naturopathy), MESCO Para-military Training, MSRTC Drivers Training Courses, खावटी अनुदान योजना इत्यादी योजना राबविल्या जात आहेत. तसेच मानव विकास मिशन अंतर्गत नंदुरबार जिल्ह्यात 'आमचूर निर्मिती व विक्री' आणि गडचिरोली जिल्ह्यात 'मोहफुल : आदिवासींच्या उपजीविकेचे एक साधन' प्रकल्प मंजूर करण्यात आलेले आहेत. सदर आदिवासींच्या उपजीविका आधारित विकासात्मक योजना राबविणेसाठी पुरेसे मनुष्यबळ असणे अत्यावश्यक आहे.

सद्यास्थित एकूण ७२ मंजूर पदांपैकी फक्त १५ पदे भरण्यात आलेली आहेत. वरीलप्रमाणे आदिवासींच्या उपजीविका वृद्धीचे प्रकल्प राबविणेसाठी तांत्रिक सहाय्य संस्था (Technical Support

Agency) आणि अनुभवी व तज्ञ मनुष्यबळ (Thematic Experts) असणे अत्यावश्यक आहेत. शासनामार्फत भरण्यात आलेल्या पदांमध्ये सदर योजना राबविणेसाठी लागणारे अनुभवी व तज्ञ मनुष्यबळ यांचा अभाव आहे.

याकरिता संदर्भ क्र. १ नुसार या कार्यालयास Swaniti Initiative, New Delhi या संस्थेने शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळासोबत आदिवासींच्या उपजीविका वृद्धीसाठी राबविण्यात येत असलेले प्रकल्पांकरिता तांत्रिक सहाय्य व ग्रामीण स्तरावर योजना राबविण्यासाठी लागणारे मनुष्यबळ उपलब्ध करून देणेबाबत प्रस्ताव सादर केलेला आहे. शबरी महामंडळासोबत प्रस्तावित सहाय्य करण्यास Swaniti Initiative, New Delhi या संस्थे कडून कुठलेही शुल्क आकारण्यात येणार नाही. संस्थेसोबत होणारे कार्य हे Non-Financial Partnership प्रकारचे असेल. संदर्भ क्र. २ नुसार मा. मंत्री महोदय, आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई यांचेकडून Swaniti Initiative, New Delhi या संस्थेसोबत Non-Financial Partnership करणेसाठी मान्यता प्राप्त झालेली आहे. करिता Swaniti Initiative, New Delhi यांचे सोबत करारनामा करून पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

**ठराव क्र.१८ :- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणेसाठी** Swaniti Initiative, New Delhi **यांची मदत घेण्यास सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे.**

**सुचक :-** मा.व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक
**अनुमोदक :-** मा.श्री.रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई-३२

**विषय क्र. १९ : आदिवासी घटक कार्यक्रमा अंतर्गत सन २०२३-२४ या वर्षात जनजाती उपयोजना क्षेत्राकरीता केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजने अंतर्गत संयुक्त दायित्व गटाच्या माध्यमातून पथदर्शी दुग्धविकास प्रकल्प मार्गदर्शक सूचना तसेच अंमलबजावणी बाबत...**

राज्य शासनांतर्गत आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत सन २०२३-२४ या वर्षात जनजाती उपयोजना क्षेत्राकरिता केंद्रवर्ती अर्थ संकल्प योजनेंतर्गत गरजू आदिवासी कुटुंबांचे संयुक्त दायित्व गट (JGSs) तयार करून त्यांना दुधाळ जनावरांचे (गायी) वाटप करून दुग्धविकास प्रकल्प राबविण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे.

योजनेंतर्गत ५ आदिवासी लाभार्थ्यांच्या संयुक्त दायित्व गटाचे गठन करून सदर २५०० गटांच्या माध्यमातून पथदर्शी पथदर्शी दुग्ध विकास प्रकल्प राबविण्याच्या रु. १५९,३०,५०,०००/- इतक्या निधीच्या योजनेच्या प्रस्तावास शासनाकडून मान्यता देण्यात आलेली आहे.

केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेंतर्गत संयुक्त दायित्व गटांना दुधाळ जनावरे पालन करणे योजना प्रकल्प अधिकारी डहाणू, जव्हार, धुळे, नंदुरबार व कळवण या प्रकल्पात पथदर्शी स्वरुपात शबरी आदिवासी वित्त व

विकास महामंडळ मर्या., नाशिक यांचे मार्फत राबविण्याचे आदेश आहेत. मा. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचेकडून शबरी महामंडळ यांचे बँक खात्यात रक्कम रु. रु. १५९,३०,५०,०००/-वर्ग करण्यात आलेला आहे.

सदर योजना अंमलबजावणीच्या अनुषंगाने पुढील सविस्तर मार्गदर्शक सूचना व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक यांचे मार्फत निर्गमित करून योजनेच्या अंमलबजावणी यंत्रणेसोबत करारनामा करण्यात यावा असे नमूद केलेले आहे.

करिता सदर योजनेच्या प्रारूप मार्गदर्शक सूचना तयार करून आपले माहितीस्तव सादर करण्यात येत आहे. शबरी महामंडळामार्फत मार्गदर्शक सूचना निर्गमित झाले नंतर सुमूल - सूरत मिल्क युनियन लिमिटेड यांचे सोबत करारनामा करून योजनेची अंमलबजावणी सुरु करण्यात येईल.

**ठराव क्र.१९ :- आदिवासी घटक कार्यक्रमा अंतर्गत सन २०२३-२४ या वर्षात जनजाती उपयोजना क्षेत्राकरीता केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजने अंतर्गत संयुक्त दायित्व गटाच्या माध्यमातून पथदर्शी दुग्धविकास प्रकल्प मार्गदर्शक सुचनांना सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे.**

**सुचक** :- मा.श्री.रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई-३२
**अनुमोदक :-** व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक

**विषय क्र २० : शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत कौशल्य विकास, रोजगार, स्वयंरोजगार योजना राबविणेबाबत.**

शासन निर्णय क्रमांकः विकेस-२०२१/प्र.क्र.१६/का.१९ आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई दि.२५/०१/२०२३ शासन निर्णयान्वये आदिवासी विकास विभागामार्फत क्षेत्रीय कार्यालयाकडून हाताळण्यात येणाऱ्या विषयांमध्ये सुसुत्रता आणण्यासाठी काही विषयांचे फेर वाटप करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने आदिवासी विकास विभागांतर्गत खालीलप्रमाणे विषय शबरी महामंडळाकडे वर्ग करण्यात आलेले आहेत.

| अ.क्र. | विषय | विषय सध्या हाताळणारे कार्यालय | विषय यापुढे हाताळणारे कार्यालय |
|---|---|---|---|
| १. | आदिवासी लोकांसाठी स्वयंरोजगार व उद्योगांसाठी मार्गदर्शन करणे. | आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे | शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ, नाशिक. |
| २. | आदिवासी महीलांना प्रशिक्षण देणे. | | |
| ३. | कौशल्य विकासाची नियमित योजना (लेखाशीर्ष २२२५ डी २६२) | | |

उपरोक्त नमुद केल्यानुसार आदिवासी विकास विभागांतर्गत विषयांचे सुधारीत वाटप केल्याप्रमाणे कौशल्य विकास, रोजगार, स्वयंरोजगार योजना शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत राबविणेकामी मा.संचालक मंडळाच्या मान्यतेस सादर.

**ठराव क्र.२० :- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत कौशल्य विकास, रोजगार, स्वयंरोजगार योजना राबविणेसाठी तयार करण्यांत आलेल्या मार्गदर्शक सुचनांना सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे. याबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्याचे व यापुढील कार्यवाही करण्याचे व्यवस्थापकीय संचालक यांना सर्व अधिकार देण्यांत येत आहे.**

**सुचक :-** मा.व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक
**अनुमोदक :-** मा.श्री.रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई-३२

**विषय २१ : शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ, मर्या., नाशिक मार्फत सन २०२३-२४ साठी नवीन योजनांचे प्रस्ताव.**

**अ) शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक यांचेमार्फत आमचूर, मका, भरडधान्य व स्ट्रोबेरी यांचे मूल्य साखळी आधारित प्रकल्पांचे प्रस्ताव शासनास सादर करणेबाबत...**

केंद्रीय सहाय्य योजनेतंर्गत आदिवासी कार्य मंत्रालय, केंद्र सरकार यांच्याकडुन अनुसूचीत जमातीच्या विकासातील तफावत (Gap) दूर करण्यासाठी शिक्षण, आरोग्य, कृषी आणि उत्पन्न वाढ इ. क्षेत्राकरीता नाविन्यपुर्ण प्रकल्प मंजुर करण्यात येतात. शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या मार्फत आदिवासी जनतेच्या सर्वांगीण विकास व कल्याणा करिता कृषि उत्पादन क्षमता वाढविणे, कषि प्रक्रिया, कृषि विपणन, जल संधारण विकास, शेळी विकास कार्यक्रम, कुक्कुटपालन विकास, मत्स्यव्यवसाय रोजगार, उपजीविका, पर्यटन सारख्या विविध योजना राबविण्यात येतात. भविष्यात देखील अशा योजनेवर महामंडळाने लक्ष केद्रित करण्याचे ठरविले आहे.

शबरी महामंडळामार्फत सन 2022-23 या आर्थिक वर्षात आदिवासी बहूल भागातील कार्यरत शेतकरी उत्पादक कंपन्या, आदिवासी ग्राम सभा/फेडरेशन, आदिवासीसाठी काम करणा-या संस्था, CSR Foundation, NGOs यांचे मार्फत समवेत आदिवासींचे उपजीविका वृद्धीसाठी कार्य करण्याचे नियोजन आहे.

यानुसार खालील प्रस्ताव पुढील मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहेत.

| S. N. | Proposal | Area | Beneficiaries | Proposed Cost (Lakh) |
|---|---|---|---|---|
| 1 | Amchur & Raw Mango Processing | Akkalkuwa & Dhadgaon blocks of Nandurbar district | 600 | 294.04 |
| 2 | Maize Primary Processing Cluster | Dhule District | 300 | 135.28 |
| 3 | Millets Primary Processing Cluster | Dhule & Nandurbar district | 600 | 301.41 |
| 4 | Strawberry Cluster Development Project | Akkalkuwa & Dhadgaon blocks of Nandurbar district | 200 | 443.31 |

सन 2022-23 करीता विशेष केंद्रीय सहाय्य, भा.सं.अनु. 275(1) व आदिम जमाती विकास कार्यक्रम या अंतर्गत वरीलप्रमाणे प्रस्ताव मंजूर होण्यासाठी आदिवासी कार्य मंत्रालय, केंद्र सरकार, नवी दिल्ली यांना पाठविण्यासाठी शासनास सादर करण्यात आलेले आहेत.

**ठराव क्र.२१ :- अ) शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक यांचेमार्फत आमचूर, मका, भरडधान्य व स्ट्रोबेरी यांचे मूल्य साखळी आधारित सादर केलेले प्रकल्पांचे प्रस्ताव मंजुर करणेसाठी शासन स्तरावर पाठपुरावा करणेच्या सुचना देण्यांत आल्या.**

**सुचक :-** मा.श्री.रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई-३२
**अनुमोदक :-** मा.व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक

**विषय क्र.२१- ब) शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक यांचेमार्फत Comprehensive Support for Formation of Farmers Producer Companies in tribal prone areas of Maharashtra योजना राबविनेसाठीचा प्रस्ताव सादर करणेबाबत...**

महाराष्ट्रात शासनाचे विविध जसे कृषी विभाग, आत्मा, MACP, Magnet, SMART, SFSC, NABARD, PoCRA, CSR Organizations, NGOs इत्यादी यांचे मार्फत तयार करण्यात आलेल्या शेतकरी उत्पादक कंपनिंमध्ये आदिवासींच्या शेतकरी उत्पादक कंपन्या व आदिवासी सभासदांचे प्रमाण खूप कमी आहे. त्यामुळे शासनच्या विविध योजनांच्या लाभ महाराष्ट्रातील आदिवासी कुटुंबांना मिळत नाही. याकरिता राज्यातील आदिवासी बहुल भागात आदिवासींचे शेतकरी उत्पादक कंपनी (FPC) स्थापन करून त्यांचे प्रशिक्षण, क्षमता बांधणी, व्यवसाय आराखडा तयार करणे, पायाभूत सुविधा उभारणी तसेच खेळते भांडवल इत्यादी सहाय्य करणे गरजेचे आहे. यासाठी शबरी महामंडळ पुढीलप्रमाणे कार्य करू इच्छिते.

**Area –** Tribal parts of Maharashtra.

**Period –** 3 Years (2023 to 2025)

**Target –** 60 FPCs each comprise 300 tribal beneficiaries (Total 18,000 HHs).

**Costs for one FPC –**

| S. N. | Particular | Activity | Amount (Lakh) |
|---|---|---|---|
| 1 | FPC Formation & Incubation Support | Baseline Survey / Diagnostic Study for Cluster Identification & Beneficiaries selection | 1 |
| 2 | | Awareness Programs | 0.5 |
| 3 | | Formation of FPGs | 0.5 |
| 4 | | Selection of BoDs & Promoters | 0.2 |
| 5 | | FPC Registration | 0.5 |
| 6 | Training & Capacity Building Support | Trainings for BoDs/ Promoters/FPG members | 5 |
| 7 | | Exposure for BoDs/ Promoters/FPG members | 3 |
| 8 | | Preparation of Business Plan | 1 |
| 9 | | Meetings of BoDs/ Promoters/FPG members | 2.4 |
| 10 | | Farmers Workshop/ Melava/Exhibition | 2 |
| 11 | FPC Support Costs | FPC Manpower Cost - CEO (2 Years) | 9.6 |
| 12 | | FPC Manpower Cost - 1 Staff (2 Years) | 4.8 |
| 13 | | Travel and Meeting Cost (2 Year) | 2.4 |
| 14 | | FPC Operation Cost (Office, Stationary, Computer etc.) | 1 |
| 15 | | Other Contingency | 0.5 |

| | | | |
|---|---|---|---|
| 16 | Support for Business/Livelihoods Activity | Infrastructure, Machineries, Processing, Packaging, Branding, Marketing etc | 30 |
| 17 | | Working Capital | 20 |
| 18 | Support for Implementing Agency | Implementing Agency/Technical Support Agency Cost | 5 |
| 19 | Shabari Mahamandal Management Cost | Cost for overall implementation, coordination, monitoring & evaluation etc. | 2 |
| | | **Total** | **91.4** |

शबरी महामंडळाच्या नियोजनानुसार २ वर्षाच्या कालावधीत एकूण ६० शेतकरी उत्पादक कंपनी (FPCs) स्थापन करण्याचे नियोजन आहे. याकरिता एकूण रक्कम रु. ५४८४/- लक्ष निधीची अवशक्यता आहे. वर्षनिहाय निधीची आवशक्यता पुढीलप्रमाणे

**Year Wise Costs -**

| Sr. No. | Particular | Activity | Unit Cost (Lakh) | Year 1 | Year 2 | Year 3 | Total (Lakh) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | FPC Formation & Incubation Support | Baseline Survey / Diagnostic Study for Cluster Identification & Beneficiaries selection | 1 | 30 | 30 | 0 | 60 |
| 2 | | Awareness Programs | 0.5 | 15 | 15 | 0 | 30 |
| 3 | | Formation of FPGs | 0.5 | 15 | 15 | 0 | 30 |
| 4 | | Selection of BoDs & Promoters | 0.2 | 6 | 6 | 0 | 12 |
| 5 | | FPC Registration | 0.5 | 15 | 15 | 0 | 30 |
| 6 | Training & Capacity Building Support | Trainings for BoDs/ Promoters/FPG members | 5 | 75 | 150 | 75 | 300 |
| 7 | | Exposure for BoDs/ Promoters/FPG members | 3 | 45 | 90 | 45 | 180 |
| 8 | | Preparation of Business Plan | 1 | 30 | 30 | 0 | 60 |
| 9 | | Meetings of BoDs/ Promoters/FPG members | 2.4 | 36 | 72 | 36 | 144 |
| 10 | | Farmers Workshop/ Melava/ Exhibition | 2 | 0 | 60 | 60 | 120 |
| 11 | FPC Support Costs | FPC Manpower Cost - CEO (2 Years) | 9.6 | 144 | 288 | 144 | 576 |
| 12 | | FPC Manpower Cost - 1 Staff (2 Years) | 4.8 | 72 | 144 | 72 | 288 |
| 13 | | Travel and Meeting Cost (2 Year) | 2.4 | 36 | 72 | 36 | 144 |
| 14 | | FPC Operation Cost (Office, Stationary, Computer etc.) | 1 | 30 | 30 | 0 | 60 |
| 15 | | Other Contingency | 0.5 | 15 | 15 | 0 | 30 |
| 16 | Support for Business/Livelihoods Activity | Infrastructure, Machineries, Processing, Packaging, Branding, Marketing etc | 30 | 450 | 900 | 450 | 1800 |
| 17 | | Working Capital | 20 | 600 | 600 | 0 | 1200 |
| 18 | Support for Implementing Agency | Implementing Agency/Technical Support Agency Cost | 5 | 75 | 150 | 75 | 300 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 19 | Shabari Mahamandal Management Cost | Cost for overall implementation, coordination, monitoring & evaluation etc. | 2 | 60 | 60 | 0 | 120 |
| | | **Total** | **91.4** | **1749** | **2742** | **993** | **5484** |

करिता सदर योजना राबविण्यासाठी शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक यांना एकूण रक्कम रु. ५४.८४/- कोटी निधीची आवश्यकता आहे. करिता सदर निधीची राज्य शासनाकडून उपलब्धता करून देण्यात यावी.

**ठराव क्र.२१ :- ब) शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक यांचेमार्फत Comprehensive Support for Formation of Farmers Producer Companies in tribal prone areas of Maharashtra योजना राबविण्यासाठी निधी उपलब्ध करुन देणेकामी मा.मंत्री, आदिवासी विकास तथा अध्यक्ष शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ यांचे स्तरावरुन शासनास पाठपुरावा करण्याचे ठरविण्यांत आले.**

**सुचक :-** मा.श्री.रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई-३२
**अनुमोदक :-** मा.व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक

**विषय क्र.२२- एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत कर्ज योजनेचा सन २०२३-२४ साठी एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांना प्रस्ताव सादर करणेबाबत.**

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळा मार्फत अनुसूचित जमातीचे सुशिक्षित बेरोजगारांना त्यांचे जीवनमान उंचावण्याकरीता स्वयंरोजगारासाठी अल्प व्याजदराने एन.एस.टी.एफ.डी.सी.,नवी दिल्ली पुरस्कृत विविध कर्ज योजना राबविण्यांत येतात.

शासन निर्णय क्रमांक-शाहमी-२०१९/प्र.क्र.५७/अर्थबळ वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई दि.०९ सप्टेंबर, २०१९ अन्वये शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळास राष्ट्रीय अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळ मर्या., नवी दिल्ली (NSTFDC., New Delhi) पुरस्कृत योजनांसाठी रुपये ५० कोटी शासन हमी पुढील पाच वर्षासाठी मिळालेली आहे. त्यानुसार एन.एस.टी.एफ.डी.सी.,नवी दिल्ली यांचेकडून शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळास रक्कम रु.१८.१६ कोटी आजपावेतो प्राप्त झालेले आहेत. सदर प्राप्त निधी अंतर्गत शबरी महामंडळामार्फत लाभार्थी निवडीची प्रक्रीया करण्यांत आलेली असुन योजना अंमलबजावणीची कार्यवाही सुरु आहे.

त्याअनुषंगाने प्राप्त निधीच्या व्यतिरिक्त उर्वरित निधी मागणीसाठी राष्ट्रीय अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळ., नवी दिल्ली (एन.एस.टी.एफ.डी.सी.,नवी दिल्ली) यांचेकडे विविध योजनांचा / व्यवसायांचा सन २०२३-२४ करीता रक्कम रु.१७ कोटी निधीची प्रस्ताव सादर करावयाचे नियोजन आहे.

| Sr No. | Schemes Name | No. Of Units | Unit Cost | NSTFDC Share for units | | Shabari Contribution | | Beneficiary Contribution | | Total Project Cost | Percentage (As per NSTFDC Sector Allocation NSTFDC Project Cost) | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Percentage | Share Amount | Percentage | Share Amount | Percentage | Share Amount | | | |
| 1 | Mahila Sablikaran (Rs.2Lakh) | 202 | 200000 | 90% | 36360000 | 10% | 4040000 | 0% | 0 | 40400000 | 21.39% | Scheme No1,2,3 is coverd Near About 40% to 50%Agri culture & Allied Sector |
| 2 | Micro Credit (Rs.5 Lakh) | 21 | 500000 | 90% | 9450000 | 10% | 1050000 | 0% | 0 | 10500000 | 5.56% | |
| 3 | Agriculture & Allied Bussines (Rs.2 Lakh) | 264 | 200000 | 90% | 47520000 | 5% | 2640000 | 5% | 2640000 | 52800000 | 27.96% | |
| 4 | Hotel/Dhaba (Rs.5 Lakh) | 60 | 500000 | 90% | 27000000 | 5% | 1500000 | 5% | 1500000 | 30000000 | 29.92% (Service Sector) | |
| 5 | Workshop/Spare Parts (Rs.5 Lakh) | 53 | 500000 | 90% | 23850000 | 5% | 1325000 | 5% | 1325000 | 26500000 | | |
| 6 | Vehicle Scheme(Rs. 10 Lakh) | 19 | 1000000 | 90% | 17100000 | 5% | 950000 | 5% | 950000 | 19000000 | 10.06% (Transport Sector) | |
| 7 | Small Scale Industries Business (Rs.3Lakh) | 32 | 300000 | 90% | 8640000 | 5% | 480000 | 5% | 480000 | 9600000 | 5.08% (Industrial Secotor) | |
| | Total | 651 | | | 169920000 | | 11985000 | | 6895000 | 188800000 | | |

उपरोक्त नमुद प्रस्ताव एन.एस.टी.एफ.डी.सी.,नवी दिल्ली यांचे मार्गदर्शक सुचनेनुसार तयार केला असुन सदर प्रस्ताव एन.एस.टी.एफ.डी.सी.,नवी दिल्ली यांना सादर करण्यास मंजुरी मिळणेकामी सदर विषय मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी सादर केला आहे.

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

**ठराव क्र.२२ :- एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत कर्ज योजनेचा सन २०२३-२४ साठी एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांना प्रस्ताव सादर करण्यास व पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांना देण्यांत येत आहे.**

**सुचक** :- मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक

**अनुमोदक** :- मा.श्रीमती नयना गुंडे, आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक

**विषय क्र.२३- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत राबविण्यांत येणाऱ्या विविध कर्ज योजनेसाठी प्राप्त होणाऱ्या निधी अंतर्गत आदिवासी विविध सहकारी संस्था (रु.५.०० कोटी), बचतगट (रु.५.०० कोटी), वैयक्तिक लाभार्थी (रु.७.०० कोटी) कर्ज योजनेचा प्रस्ताव एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांना प्रस्ताव सादर करणेबाबत.**

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळा मार्फत अनुसूचित जमातीचे सुशिक्षित बेरोजगारांना त्यांचे जीवनमान उंचावण्याकरीता स्वयंरोजगारासाठी अल्प व्याजदराने एन.एस.टी.एफ.डी.सी.,नवी दिल्ली पुरस्कृत विविध कर्ज योजना राबविण्यांत येतात.

शासन निर्णय क्रमांक-शाहमी-२०१९/प्र.क्र.५७/अर्थबळ वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई दि.०९ सप्टेंबर, २०१९ अन्वये शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळास राष्ट्रीय अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळ मर्या., नवी दिल्ली (NSTFDC., New Delhi) पुरस्कृत योजनांसाठी रुपये ५० कोटी शासन हमी पुढील पाच वर्षासाठी मिळालेली आहे. त्यानुसार एन.एस.टी.एफ.डी.सी.,नवी दिल्ली यांचेकडून शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळास रक्कम रु.१८.१६ कोटी आजपावेतो प्राप्त झालेले आहेत. सदर प्राप्त निधी अंतर्गत शबरी महामंडळामार्फत लाभार्थी निवडीची प्रक्रीया करण्यांत आलेली असुन योजना अंमलबजावणीची कार्यवाही सुरु आहे.

शबरी महामंडळामार्फत सदर योजने अंतर्गत सन २०२३-२४ साठी राष्ट्रीय अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळ., नवी दिल्ली (एन.एस.टी.एफ.डी.सी.,नवी दिल्ली) यांचेकडे रक्कम रु.१७ कोटी निधीची प्रस्ताव सादर करावयाचे नियोजन आहे.

शासन थकहमीनुसार उर्वरित मंजुर निधीसाठी शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत आदिवासींचे उपजिविका वृद्धी करीता मोठया प्रमाणात (Bulk Finance) उपलब्ध करुन आदिवासी विविध सहकारी संस्था (रु.५.०० कोटी), बचतगट (रु.५.०० कोटी), वैयक्तिक लाभार्थी (रु.७.०० कोटी) यांचेसाठी कर्ज उपलब्ध करुन देणेकामी एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांना प्रस्ताव सादर करण्याचे नियोजन असुन सदर विषयास मंजुरी मिळणेकामी सदर विषय मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी सादर केला आहे.

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

**ठराव क्र.२३ :- शासन थकहमीनुसार उर्वरित मंजुर निधीसाठी शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत आदिवासींचे उपजिविका वृद्धी करीता मोठया प्रमाणात (Bulk Finance) उपलब्ध करुन आदिवासी विविध सहकारी संस्था (रु.५.०० कोटी), बचतगट (रु.५.०० कोटी), वैयक्तिक लाभार्थी (रु.७.०० कोटी) यांचेसाठी कर्ज उपलब्ध करुन देणेकामी एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांना प्रस्ताव सादर करण्यास व पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांना देण्यांत येत आहे.**

**सुचक** :- मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक
**अनुमोदक** :- मा.रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

**विषय क्र.२४- राज्य शासनाच्या निधीतून शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत कर्ज योजनेच्या धर्तीवर आदिवासींचे उपजिविका वृद्धी करीता स्वतंत्र योजना राबविणेबाबत.**

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाची स्थापना शासनाचे आदिवासी विकास विभाग मंत्रालय, मुंबई. शासन निर्णय क्रमांक आविम-२३९६/४५/प्र.क्र.३९/ का-३ मुंबई दिनांक ९ डिसेंबर, १९९८ अन्वये महामंडळाची निर्मिती करण्यांत आलेली आहे. महामंडळाची नोंदणी कंपनी कायदा १९५६ अन्वये रजिस्टर ऑफ कंपनीज यांच्याकडे नोंदणी करण्यात आली असून कंपनीचा नोंदणी क्र.२५-१३२४७/१९९९ दिनांक १५ जानेवारी, १९९९ हा आहे. तसेच शबरी महामंडळाचा CIN No. U74210MH1999SGC118747 असा आहे.

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळा मार्फत अनुसूचित जमातीचे सुशिक्षित बेरोजगारांना त्यांचे जीवनमान उंचावण्याकरीता स्वयंरोजगारासाठी अल्प व्याजदराने एन.एस.टी.एफ.डी.सी.,नवी दिल्ली पुरस्कृत विविध कर्ज योजना राबविण्यांत येतात. त्याच धर्तीवर शबरी महामंडळामार्फत स्वयंरोजगारासाठी अनुसूचित जमातीचे इच्छुक लाभार्थ्यांना विविध कर्ज योजनांचा लाभ देणेकामी राज्य शासनाच्या निधीतून शबरी आदिवासी

वित्त व विकास महामंडळा मार्फत आदिवासींचे उपजिविका वृद्धी करीता स्वतंत्र योजना राबविण्याचे नियोजन आहे. तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.no | Schemes Name | No. of Beneficiaries | Total Project Cost (Rs. In Crore) |
|---|---|---|---|
| 1. | Self-Employment Scheme for Any Business (Rs.2 Lakh) | 2500 | 50.00 |
| 2. | Livelihood Scheme for Tribals | 50 | 50.00 |
| | **Total** | **2550** | **100.00** |

करीता एन.एस.टी.एफ.डी.सी.,नवी दिल्ली पुरस्कृत कर्ज योजनेच्या धर्तीवर योजना राबविण्यास निधी मिळणेकामी राज्य शासनास प्रस्ताव सादर करण्यास मा.संचालक मंडळाची मंजुरी मिळणेकामी सदर विषय मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी सादर केला आहे.

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

**ठराव क्र.२४ :- राज्य शासनाच्या निधीतून शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत एन.एस.टी.एफ.डी.सी., नवी दिल्ली पुरस्कृत कर्ज योजनेच्या धर्तीवर आदिवासींचे उपजिविका वृद्धी करीता स्वतंत्र योजना राबविणेबाबत सर्वानुमते मंजुरी देण्यांत येत आहे. व याबाबत पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांना देण्यांत येत आहे.**

**सुचक** :- मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक
**अनुमोदक** :- मा.श्रीमती नयना गुंडे, आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक

**विषय क्र.२५- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळासाठी बाबनिहाय प्राप्त भागभांडवलाचे पुर्नरचना करणेबाबत.**

शासन निर्णय क्र.आविम-२००४/प्र.क्र.१५/ का.३ दि.२४ ऑगस्ट, २००४ नुसार शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल रु.१०० कोटी वरुन रु.२०० कोटी इतके करण्यास मंजुरी देण्यात आलेली आहे.

यापैकी ५१% भाग भांडवल वर्गणी राज्य शासनाची राहील तर ४९% भाग भांडवल केंद्र शासनाकडून उभारावयाचे आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

(रुपये कोटी)

| तपशिल | ५१% राज्य शासन हिस्सा | ४९% केंद्र शासन हिस्सा |
|---|---|---|
| रु.२०० कोटी नुसार होणारी भागभांडवल रक्कम | १०२.०० | ९८.०० |
| वजा - एकूण प्राप्त भागभांडवल | ८३.५९ | ४.५३ |
| **कमी प्राप्त रक्कम** | **१८.४१** | **९३.४७** |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या भागभांडवलापैकी खालील तपशिलाप्रमाणे शिल्लक भागभांडवल रक्कम रु. १५,१५,२९,०००/- ची पुर्नरचना / भागभांडवलाची बाब बदलण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | वर्ष | मंजुर आदेशातील भागभांडवल रक्कम खर्च करावयाच्या बाबी | शिल्लक रक्कम रु. | भागभांडवलाची पुर्नरचना |
|---|---|---|---|---|
| १ | १९९९-२००० | खेळते भागभांडवल | ६,५०,००,०००/- | १) एन.एस.टि.एफ.डी.सी, नवी दिल्ली यांचे धर्तीवर कर्ज स्वरुपात नवीन योजना राबविणेबाबत.<br>२) आदिवासी लाभार्थ्यांना व्यवसायाकरीता खेळते भांडवल म्हणुन कर्ज निधी उपलब्ध करुन देण्याबाबत इत्यादी. |
| २ | २०१८-२०१९ | कार्यालयीन इमारत / प्लॉट खरेदी व नुतनीकरणासाठी | ५,६५,२९,०००/- | |
| ३ | २०१८-२०१९ | सहकारी संस्था / बचत गटाचे उत्पादीत मालाचे विक्रीसाठी प्रत्येक शाखा कार्यालय स्तरावर प्रदर्शन व विक्री स्टॉल खरेदी करणेसाठी गाळे खरेदी करणे. | ३,००,००,०००/- | |
| | | **एकुण रक्कम रु.** | **१५,१५,२९,०००/-** | |

सदरच्या मान्यतेनंतर शासनास प्रस्ताव सादर करुन पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांना देणेकामी सदर विषय मा.संचालक मंडळ सभेत सादर केला आहे.

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

**ठराव क्र.२५ :- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळासाठी बाबनिहाय प्राप्त भागभांडवलाचे पुर्नरचना करणेबाबत शासनास प्रस्ताव सादर करुन पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांना देण्यांत येत आहे.**

**सुचक** :- मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक
**अनुमोदक** :- मा.रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

**विषय क्र.२६- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळा अंतर्गत आदिवासी समाजातील बेरोजगार युवक युवतींची सर्वंकष माहीती संकलीत करणेसाठी तसेच महामंडळामार्फत राबविण्यांत येणाऱ्या विविध योजनांसाठी वेब पोर्टल/ संकेतस्थळ तयार करणेबाबत.**

आदिवासी समाज दुर्गम भागात वास्तव्यास असल्यामुळे सदर समाजातील कार्यप्रवण वयोगटातील उमेदवारांना त्यांच्या कडील शैक्षणिक पात्रता किंवा कला कौशल्यांच्या आधारे ज्या रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत त्यांची माहिती उपलब्ध होणेकामी आदिवासी समाजातील बेरोजगार आदिवासी युवक युवतींची माहिती संकलित करुन त्यांना त्या आधारे रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्याकरीता शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत वेब पोर्टल तयार करण्याचे नियोजन आहे.

तसेच शासन निर्णय क्रमांकः विकेस-२०२१/प्र.क्र.१६/का.१९ आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई दि.२५/०१/२०२३ शासन निर्णयान्वये आदिवासी विकास विभागामार्फत क्षेत्रीय कार्यालयाकडून हाताळण्यात येणाऱ्या विषयांमध्ये सुसुत्रता आणण्यासाठी कौशल्य विकास, रोजगार, स्वयंरोजगार योजना शबरी महामंडळाकडे वर्ग करण्यात आलेली आहेत. त्याअनुषंगाने शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत राबविण्यांत येणाऱ्या योजनांचा प्रचार / प्रसार करुन रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी Online व्यवस्था उपलब्ध व्हावी यासाठी वेब पोर्टल / संकेतस्थळ तयार करण्याचे नियोजन

आहे. त्यानुसार शबरी महामंडळामार्फत वेब पोर्टल/ संकेतस्थळ तयार करण्याची कार्यवाही चालु आहे. सदर विषयास संचालक मंडळाची मंजुरी मिळणेकामी सदर विषय मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी सादर केला आहे.

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

**ठराव क्र.२६ :- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळा अंतर्गत आदिवासी समाजातील बेरोजगार युवक युवतींची सर्वंकष माहीती संकलीत करणेसाठी तसेच महामंडळामार्फत राबविण्यांत येणाऱ्या विविध योजनांसाठी वेब पोर्टल/ संकेतस्थळ तयार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येत आहे. व याबाबत पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांना देण्यांत येत आहे.**

**सुचक** :- मा.रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
**अनुमोदक** :- मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक

**विषय क्र.२७- श्री.प्रशांत लक्ष्मण ब्राम्हणकर, वरिष्ठ सल्लागार, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., मुख्य कार्यालय नाशिक यांचे नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे बाबत. तसेच नव्याने वरिष्ठ सल्लागार, नियुक्तीचे प्रक्रीयेस मान्यता मिळणेबाबत.**

शबरी आदिवासी वित्त व व विकास महामंडळाअंतर्गत शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी, कृषि विकास, विपणन, प्रक्रीया, पुरवठा व साठवणूक या बाबींचे सखोल ज्ञान व आधुनिक तंत्रज्ञानाची जोड असणाऱ्या अनुभवी १ वरिष्ठ सल्लागाराची व १ सहाय्यक सल्लागाराची मानधन तत्वावर नियुक्ती करण्यासाठी या कार्यालयाचे पत्र क्र.जा.क्र.शआविविम/प्रकल्प/२२८/२०१९ नाशिक दि.२०/०८/२०१९ अन्वये जाहिरात प्रसिद्ध करण्यांत आली होती. सदर जाहिरातीत नमुद केल्यानुसार वरिष्ठ सल्लागार पदासाठी मानधन तत्वावर १ वर्षासाठी, कामाचे मुल्यमापनानुसार दरवर्षी १ वर्षासाठी मुदतवाढ याप्रमाणे जास्तीत जास्त ३ वर्षासाठी नेमणूक करणेबाबत नमुद करण्यांत आले आहे.

त्यानुषंगाने श्री.प्रशांत लक्ष्मण ब्राम्हणकर, वरिष्ठ सल्लागार, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., मुख्य कार्यालय नाशिक यांना वेळोवेळी यापुर्वी ३ वेळेस तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर मासिक रक्कम रु.१,३०,०००/- प्रमाणे नियुक्ती (मुदतवाढ) देण्यात आलेली आहे.

सद्यस्थितीत शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत विविध नाविन्यपूर्ण योजना राबविण्यात येत असुन श्री.प्रशांत लक्ष्मण ब्राम्हणकर यांना सदरील कामकाजाचा अनुभव असल्याने तसेच कार्यालयीन कामकाजाची अडचण लक्षात घेता सद्यस्थितीत राबविण्यांत येणारे प्रकल्प / योजनांच्या अनुषंगाने श्री.ब्राम्हणकर यांना दि.०७/०२/२०२३ ते दि.०६/०५/२०२३ पर्यंत ०३ महिन्यांसाठी वरिष्ठ सल्लागार म्हणून तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर नियुक्ती देण्यांत आलेली आहे. सदर नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळावी. हि विनंती.

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळात नव्याने तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर ०१ वरिष्ठ सल्लागार नियुक्ती करणेकामी प्रक्रीया सुरु असुन सदर प्रक्रीयेस मान्यता मिळावी. तसेच सदर प्रक्रीया पूर्ण होईपर्यंत श्री.प्रशांत लक्ष्मण ब्राम्हणकर यांना कामकाजाचे आवश्यकतेनुसार नियुक्तीकामी मा.व्यवस्थापकीय संचालक यांना अधिकार देण्याचे मान्यतेसाठी सदर विषय मा.संचालक मंडळ यांचे मान्यतेस सादर केला आहे.

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

**ठराव क्र.२७ :- श्री.प्रशांत लक्ष्मण ब्राम्हणकर, वरिष्ठ सल्लागार, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., मुख्य कार्यालय नाशिक यांचे नियुक्तीस सर्वानुमते कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत असुन नव्याने वरिष्ठ सल्लागार, नियुक्ती प्रक्रीया पूर्ण होईपर्यंत श्री.प्रशांत लक्ष्मण ब्राम्हणकर, यांचे नियुक्तीचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांना देण्यांत येत आहे. तसेच शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळात वरिष्ठ सल्लागार पदासाठी राबविण्यांत येणाऱ्या नियुक्ती प्रक्रीयेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येत आहे. व याबाबत पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांना देण्यांत येत आहे.**

**सुचक** :- मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक
**अनुमोदक** :- मा.रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

**आयत्या वेळेचा विषय क्र.28- 1: शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक अंतर्गत आदिवासींच्या उपजीविका वृद्धीसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी तज्ञ मनुष्यबळ उपलब्ध करून घेण्याबाबत....**

शबरी महामंडळामार्फत महाराष्ट्रातील आदिवासी बहुल भागात केंद्र शासनांतर्गत विशेष केंद्रीय सहाय्य (Special Central Assistance), भारतीय राज्य घटनेच्या परिच्छेद २७५(१) (Article 275(1), आदिम जमाती विकास (CCD/PVTGs), National Scheduled Tribes Finance Development Corporation (NSTFDC), किमान आधारभूत योजना (MSP for MFP), Honey & Wax Cluster Development, Start Up India इत्यादी निधींतर्गत विविध योजना राबविल्या जात आहेत. राज्य शासनाकडून प्राप्त निधीतून निसर्गोपचार (Naturopathy), MESCO Para-military Training, MSRTC Drivers Training Courses, खावटी अनुदान योजना इत्यादी योजना राबविल्या जात आहेत. तसेच मानव विकास मिशन अंतर्गत नंदुरबार जिल्ह्यात 'आमचूर निर्मिती व विक्री' आणि गडचिरोली जिल्ह्यात 'मोहफुल : आदिवासींच्या उपजीविकेचे एक साधन' प्रकल्प मंजूर करण्यात आलेले आहेत.

सद्यास्थित एकूण ७२ मंजूर पदांपैकी फक्त १५ पदे भरण्यात आलेली आहेत. वरीलप्रमाणे आदिवासींच्या उपजीविका वृद्धीचे प्रकल्प राबविणेसाठी तांत्रिक सहाय्य संस्था (Technical Support Agency) आणि अनुभवी व तज्ञ मनुष्यबळ (Thematic Experts) असणे अत्यावश्यक आहेत. शासनामार्फत भरण्यात आलेल्या पदांमध्ये सदर योजना राबविणेसाठी लागणारे अनुभवी व तज्ञ मनुष्यबळ यांचा अभाव आहे. शबरी महामंडळामार्फत संपूर्ण राज्यात सदर योजना राबविणेसाठी सद्यस्थितीत फक्त १ वरिष्ठ सल्लागार (Senior Consultant) यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. योजना प्रभावीपणे राबविणेसाठी सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या वरिष्ठ सल्लागार (Senior Consultant) या पदाव्यतिरिक्त पुढील प्रमाणे तज्ञ मनुष्यबळ उपलब्ध करून घेणे अत्यावश्यक आहे.

अ
ा

| अ.क्र. | पद | संख्या | प्रस्तावित मानधन |
|---|---|---|---|
| १ | कृषी व्यवसाय तज्ञ (Agri. Business Expert) | १ | ६५,०००/- |
| २ | पशुधन/मत्स्य व्यवसाय तज्ञ (Livestock/ Fisheries Expert) | १ | ६५,०००/- |
| ३ | MIS & Data Analysis Expert | १ | ५०,०००/- |
| ४ | सनियंत्रण व मूल्यमापन अधिकारी (Monitoring & Evaluation Officer) | १ | ६५,०००/- |
| ५ | Young Professional/Inter (Livelihoods) | १ | ४०,०००/- |
| ६ | Young Professional/Inter (Media & Mass Communication) | १ | ४०,०००/- |

सदर मनुष्यबळ उपलब्ध करून घेणेसाठी शबरी महामंडळामार्फत दिनांक 12.11.2022 रोजी दैनिक पुण्यनगरी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली होती. सदर जाहिरातीत दिनांक 25.11.2022 पर्यंत अर्ज मागविण्यात आलेले होते. या प्रक्रियेत एकूण ३२० अर्ज प्राप्त झालेले आहेत. सदर प्राप्त अर्जांची छाननी मा. व्यवस्थापकीय संचालक सो. यांचे दालनात करण्यात आली असून सल्लागार नियुक्तीबाबत निवड्सुची अंतिम करण्याची कार्यवाही सुरु आहे. करिता उपरोक्त नमुद केल्यानुसार मानधन तत्वावर सल्लागार नियुक्ती बाबत राबविण्यात आलेल्या संपूर्ण प्रक्रियेस मा.संचालक मंडळाची मंजुरी मिळणेकामी सदर विषय मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी सादर केला आहे.

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

**आयत्या वेळेचा ठराव क्र.२८.१ :- शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक अंतर्गत आदिवासींच्या उपजीविका वृद्धीसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी तज्ञ मनुष्यबळ उपलब्ध करून घेण्याबाबत पुढील कार्यवाही / प्रक्रीया करण्याचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांना देण्यांत येत आहे.**

**सुचक** :- मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक
**अनुमोदक** :- मा.रविंद्र जाधव, उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

**आयत्या वेळेचा विषय क्र. 28-2 : विशेष केंद्रिय सहाय्य सन 2014-15 व 2015-16 या वर्षातील पडकाई विकास (Padkai Vikas) योजनेचा अखर्चित निधी विशेष केंद्रीय सहाय्य (SCA) व आदिम जमाती विकास (PVTGs) अंतर्गत सुरु असलेल्या इतर योजनांच्या अप्राप्त निधीसाठी उपलब्ध करून देणेबाबत...**

आयुक्त आदिबासी विकास यांचे मार्फत विशेष केंद्रिय सहाय्य योजनेअंतर्गत सन 2014-15 व 2015-16 या वर्षातील पडकई विकास या योजनेचा रु. २५२१.३३ लक्ष निधी शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक यांना प्राप्त झालेला आहे.

संचालक, मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, कृषि आयुक्तालय, पुणे यांचे पत्र. जा.क्र. मृदसं/पडकई/मार्ग. सूचना/मृद-४/५९०८/२०२२ दि. १५.०२.२०२२ नुसार नुसार आदिवासी शेतकऱ्यांकडे

अतिउताराच्या जमिनीमध्ये दगडी बांधासह मजगीची कामे (पडकई विकास) करण्याबाबत सविस्तर तांत्रिक मार्गदर्शक सूचना कृषि विभागामार्फत निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्याच मार्गदर्शक सूचनांचा आधार घेऊन या कार्यालयाने पडकई विकास योजनेची अंमलबजावणी करावी असे सुचविले आहे. मा. मंत्री महोदय, आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई यांचे सूचनेनुसार सदर योजना राबविणेसाठी जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी नंदुरबार व गडचिरोली यांचे कडून सविस्तर प्रस्ताव मागविण्यात आलेले होते. परंतु या कार्यालयाकडे आजतागायत कुठलाही प्रस्ताव प्राप्त झालेला नाही. यामुळे सदर योजना राबविणे जिकरीचे झालेलं आहे.

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक यांचे मार्फत केंद्र शासनाच्या विशेष केंद्रीय सहाय्य (SCA) व आदिम जमाती विकास (PVTGs) अंतर्गत खालील योजना राबविण्यात येत आहेत. सदर योजनांचा निधीचा पुढील हप्ता अप्राप्त आहे.

| SN | Year | Scheme Name | Name of Scheme | Amount Sanctioned (Lakh) | Amount Received (Lakh) | Amount yet to Receive (Lakh) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2019-20 | SCA | Tata Trusts (Collective for Livelihoods initiatives improving HH incomes through layered agriculture-based livelihoods intervention (6000 HHs, Nandurbar. | 1354.82 | 620.00 | 734.82 |
| 2 | 2019-20 | SCA | CCD NGO- formation of FPO(s) in Gadchiroli and Yavatmal so as to leverage the benefits arising from collectivizing and to market the produce more efficiently for better price realization | 2000.00 | 500.00 | 1500.00 |
| 3 | 2020-21 | CCD | EAGL-Goat Rearing for katkari tribes | 1050.00 | 951.66 | 98.34 |
| **Total** | | | | **4404.82** | **2071.66** | **2333.16** |

सदर प्रकल्प प्रभावीपणे राबविणे तसेच मंजूर उद्दिष्ट सध्या करणेसाठी निधीचा पुढच्या हप्ता उपलब्ध करून घेणे अत्यावश्यक आहे. या करिता विशेष केंद्रिय सहाय्य योजनेअंतर्गत सन 2014-15 व 2015-16 या वर्षातील पडकई विकास या योजनेचा अखर्चित रु. २५२१.३३ लक्ष निधी हा वरील ३ योजनासाठी उपलब्ध करून देणेबाबत शासनाकडे प्रस्ताव पाठविनेबाबतचा विषय मा. संचालक मंडळाच्या सभेत मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे. मा.संचालक मंडळाची मंजुरी मिळणेकामी सदर विषय मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी सादर केला आहे.

सदर विषयावर सविस्तर चर्चा होऊन बहुमताने खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत आला आहे.

**आयत्या वेळेचा ठराव क्र.२८.२ :- विशेष केंद्रिय सहाय्य सन 2014-15 व 2015-16 या वर्षातील पडकाई विकास (Padkai Vikas) योजनेचा अखर्चित निधी विशेष केंद्रीय सहाय्य (SCA) व आदिम जमाती विकास (PVTGs) अंतर्गत सुरु असलेल्या इतर योजनांच्या अप्राप्त निधीसाठी उपलब्ध करून सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे. यासंबंधीचा प्रस्ताव शासनास सादर करण्याचे व पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार व्यवस्थापकीय संचालक यांना देण्यांत येत आहे.**

**सुचक** :- मा.श्रीमती नयना गुंडे, आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक
**अनुमोदक** :- मा. व्यवस्थापकीय संचालक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक

मा.अध्यक्ष यांच्या अनुमतीने महाव्यवस्थापक (प्रशासन) यांनी सर्व उपस्थित संचालकांचे आभार मानुन मा.अध्यक्षांचे परवानगीने सभा संपल्याचे जाहीर करण्यांत आले आहे.

व्यवस्थापक (प्रकल्प)

मा.महाव्यवस्थापक (प्रशासन)

Proceeding मान्यतेस सादर

मा.महाव्यवस्थापक (वित्त)

मा.व्यवस्थापकीय संचालक

मा.अध्यक्ष सो,
शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ मर्या., नाशिक.